रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ४३ | पृष्ठे ८+४ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. १९ जुलै २०२५

किंमत ४ ₹

## हिंदीची सक्ती करुन दाखवाच : राज ठाकरे

**ठाणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं म्हणे की, राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषासूत्री आम्ही सक्तीची करणार म्हणजे करणार. मग, सरकारला आत्महत्या करायचीच असेल तर करा. पण, महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासून हिंदी सक्तीची करण्याचा तुम्ही फक्त प्रयत्न तर करून बघा, दुकानंच नाही तर शाळाही बंद करू, असा इशाराच राज ठाकरेंनी मिरा भाईंदर येथील सभेतून दिला. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री हिंदीसाठी भांडता, कोणाच्या दबावाखाली, तुमच्यावर कोण दबाव टाकत आहे? असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला. तसेच, केंद्र सरकारकडून हा दबाव पहिल्यापासून टाकला जात आहे, काँग्रेस सरकार असतानाही तोच दबाव टाकला होता, असेही राज ठाकरे म्हणाले.

## शाळा बॉम्बने उडविण्याची धमकी

**मुंबई :** मुंबईतील एका नामांकित शाळेला बॉम्बस्फोटाची धमकी मिळाल्याने एकच खळबळ उडाली. कांदिवलीतील स्वामी विवेकानंद शाळेत शुक्रवारी सकाळी ईमेलद्वारे अज्ञाताकडून ही धमकी देण्यात आली. शाळा प्रशासनाने तात्काळ कांदिवली पोलिसांना याबाबत माहिती दिली. कांदिवली पोलीस आणि बॉम्बशोधक पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. शाळा आणि शाळेच्या परिसरात तपासणी केली असता कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आली आहे. पोलिसांनी अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करत पुढील तपास सुरू केला आहे.

## वेधक

### ‘मराठीसाठी एकत्रच राहणार’

**मुंबई :** २० वर्षांनंतर पहिल्यांदा आम्ही मराठीच्या विषयावर एकत्र आलो. आम्ही एकत्र आलोय तर ते एकत्र राहण्यासाठीच. मराठीच्या विषयावर आम्ही एकत्रच राहणार आहोत. पुढे मुद्दा येतो तो राजकारणाचा. आता कोणतीही निवडणूक जाहीर झालेली नाही. जेव्हा निवडणूक जाहीर होईल, त्यावेळी आम्ही चर्चा करू, असं शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाऊ राज ठाकरेंबरोबर युती करण्यासंदर्भात स्पष्ट केले. मुंबईत आयाजित पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी सरकारवरदेखील जोरदार हल्लाबोल केला. कोणत्याही भाषेची सक्ती आम्ही लागू करू देणार नाही, याचा अर्थ असा होत नाही की आम्ही एखाद्या भाषेला विरोध करतोय, असंही त्यांनी यावेळी म्हटलं आहे. हिंदी सक्ती आम्ही कदापि होऊ देणार नसल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

### युतीच्या काळात कर्जात वाढ

**मुंबई :** सरकारवर आधी ९ लाख १२ हजार कोटी रुपयांचे कर्ज होते ते आता १० लाख कोटी रुपयांच्या वर गेले आहे. अंतिम आठवडा प्रस्तावावर उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर उत्तर देण्याऐवजी सभागृहात बाहेरील मुद्दे सत्ताधाऱ्यांनी मांडून जनतेच्या प्रश्नांपासून पळ काढल्याचा आरोप विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला. महायुती सरकार हे जनता विरोधी असल्याचा टीका दानवे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केली. बोगस बियांचे मोठे प्रकार घडले असताना त्याबाबत कोणताही कायदा आणलेला नाही. या अधिवेशनात बऱ्याच मंत्र्यांनी टाईमपास केला आहे. जनतेच्या आणि महाराष्ट्राच्या विरोधातील हे सरकार कार्यभार चालविण्यास अपयशी ठरल्याचा आरोपही दानवे यांनी केला.

# एकनाथांच्या पुत्रास, अनाथांचा विसर?

## दोन वर्षांनंतरही इर्शाळवाडी दरडग्रस्त वाऱ्यावर

| संतोषी म्हात्रे |
| खोपोली |

**खालापुरातील इर्शाळवाडीत १९ जुलै २०२३ रोजी पावसामुळे दरड कोसळून मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली होती. तब्बल ८४ जण मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले होते. या घटनेला आज दोन वर्षे पूर्ण होत आहे. या दुर्दैवी घटनेत कोणाची आई गेली, कोणाचे वडील गेले, तर काहींचे आई-वडील गेल्याने अनेक मुले ‘अनाथ’ झाली आहेत. ती आईबापाविना पोरकी झालीत. दरम्यान, एका सामाजिक संस्थेने अनाथ मुलांना दत्तक घेण्याचे आश्वासन दिले होते. ती संस्था अनाथांचा नाथ म्हणवणाऱ्या तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे सुपुत्र खा. श्रीकांत शिंदेंची असून, त्यांनी दिलेली आश्वासने हवेत विरली असल्याचे इर्शाळवाडी दरडग्रस्त आदिवासी बांधवांनी सांगितले. आई, वडील, भाऊ, बहीण गेल्याने छत्र हरपलेली ‘अनाथ’ मुले आज आश्रमशाळेत धडे गिरवीत आहेत.**

दरम्यान, अनाथ मुलांना तालुक्यातील औद्योगिक वसाहतीत रोजगार देऊ, असे



आश्वासन देण्यात आले होते. तेसुद्धा आश्वासन पाळले गेले नाही, असा आरोपी येथील आदिवासी बांधवाधी केला आहे. सिडकोमध्ये अवघ्या दहा तरुणांना कंत्राटी पद्धतीने भरती केले असून, निम्म्याहून अधिक घरीच बसले आहेत, असे यावेळी सांगण्यात आले. जर मुलांना दत्तक घ्यायचे नव्हते, आमच्या तरुणांना नोकरी द्यायची नव्हती, तर प्रसिद्धीसाठी आश्वासन द्यायचे कशाला, असा सवाल आदिवासी बांधवांनी शासनाला केला आहे. नोकरी देण्याचा सरकारला विसर पडला आहे. तत्कालीन मुख्यमंत्री, मंत्र्यांनी येऊन दिलेले आश्वासन हवेत विरले असून, नोकरभरतीतही मुले ‘अनाथ’ राहिली असल्याचे समोर आले आहे.

सध्या १३९ लोकवस्ती असलेल्या दरडग्रस्तांना शासनाने ४३ टुमदार घरे घरं बांधली, पाणी, रस्ता, वीज दिली. मात्र, रोजगार नसल्याने उपासमारीची वेळ आली आहे. त्यामध्ये विजेचे बिल भरताना नाकीनऊ येत आहे. दरडीखाली नाचणी, वरी, भात पिकणारी २६२ दळीभाग कसदार जमीन गाडली गेली आहे. कुटुंबातील सदस्यांसह बैलजोडी, नांगर तसेच दुभती गाय, बकऱ्या मलब्याखाली गाडल्या. भाजीपाला पिकवला जात असणारी परसबागही गेली. सध्या हाताला काम नसल्याने उपासमारीची वेळ आली आहे, असे आदिवासी बांधवांचे मत आहे.

दरग्रस्तांच्या नावांवर जमीनीचा ७/१२नसल्यानेशासकीययोजनांचा लाभ घेता येत नाही, शेतकरी कर्ज, शेतीची अवजारे इत्यादी योजनांचा लाभ मिळत नसल्याने नवीन वसाहत च्या आसपास जमीन मिळावी, अद्ययावत स्मशानभूमी सह दफनासाठीही जागा उपलब्ध करून देण्याचीही मागणी केली जात आहे.



### ना. शिंदेंसमोर समस्या मांडणार

**तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कार्यकर्ता मेळाव्यानिमित्त रविवार, दि. २० जुलै रोजी खोपोली येणार आहेत. खोपोलीतील समर्थ मंगल कार्यालयात हा मेळावा पार पडणार आहे. त्यावेळी याठिकाणी मोठ्या संख्येने जाऊन आमच्या समस्या त्यांच्यासमोर मांडणार असल्याचे दरडग्रस्त आदिवासी बांधवांनी सांगितले.**

### शासनाने फिरवली पाठ

**शासनाने सुरुवातीचे तीन महिने मोफत धान्यपुरवठा, आरोग्य सेवा व गॅस सिलिंडर पुरविले. त्यानंतर इर्शालवाडी दरडग्रस्त दुर्लक्षित राहिले. कामधंद्यासाठी शेजारच्या गावात मोलमजुरी, भांडीकुंडी घासून पोट भरत आहेत. गॅस सिलिंडर पुरवठा होत नसल्याने आदिवासी महिलांना लाकडी सरपणाचा वापर करावा लागत असून, धुराने डोळे पाणावले आहेत. सध्या दरडग्रस्तांना उदरनिर्वाह, नुकसान भरपाईच्या आर्थिक मदतीवर करावा लागत आहे. ती पुंजी संपली तर पुढे काय? अशा चिंतेने दरडग्रस्तांचा दिवस मावळत आहे.**

“शासन आदेशानुसार महसूल प्रशासन वेळोवेळी दरडग्रस्तांच्या मदतीसाठी धावून गेले आहे. विविध योजनांच्या माध्यमातून येथील बांधवांना जास्तीत जास्त मदत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. यापुढेदेखील दरडग्रस्तांची कोणतीही हेळसांड होणार नाही, यासाठी प्रयत्नशील राहू. – सुधाकर राठोड, नायब तहसीलदार, खालापूर”

### साहेब, आमची झोपडीच बरी...

**तुमच्या राजमहालापेक्षा जंगलातील झोपडीच बरी, त्या ठिकाणी जंगली रानमेवा, मासे, खेकडा, चिंबोऱ्यांवर जीवन जगता तरी येते. आम्हाला आमची झोपडी प्यारी, असे दरड ग्रस्तांचे म्हणणे आहे. कुटुंबातील सदस्यांच्या आठवणींबरोबरच कोणी वालीच नसल्याची भावना आदिवासी बांधवांत झाल्याने दुसऱ्या वर्षश्राद्धात दुःखाने अश्रूंचा बांध थांबता थांबत नाही.**

# एसटी बसने महिलेला चिरडले

## रेवदंडा गोळा स्टॉप येथे भीषण अपघात

| रेवदंडा | प्रतिनिधी |



स्वारगेटहून मुरुडकडे येणाऱ्या एसटी बसने एका ७० वर्षीय महिलेला जोरदार धडक दिल्याने तिचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी (दि. १८) दुपारी ११.५५ वाजण्याच्या सुमारास रेवदंडा गोळा स्टॉपजवळ घडली.

मृत महिलेचे नाव मथुरा रामचंद्र वरसोलकर (रा. बोर्ली) असे असून, त्या रस्त्यावरून जात असताना स्वारगेट-मुरुड बस क्रमांक एम.एच.२० बीएल २९३३ ने त्यांना धडक दिली. अपघात इतका गंभीर होता की, मथुरा वरसोलकर यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली होती. दरम्यान, रेवदंडा पोलिसांनी घटनास्थळी येऊन परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. या अपघातामुळे एसटी महामंडळाच्या चालकाचा निष्काळजीपणा पुन्हा एकदा समोर आला आहे. स्थानिक नागरिकांनीही याविरोधात संताप व्यक्त केला आहे. एसटी चालकावर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याची माहिती एसटी विभागाकडून देण्यात आली आहे.

दरम्यान, अपघातानंतर एसटी चालकास पोलिसांनी ताब्यात घेतले असून, घटनेबाबत गुन्हा दाखल करण्याचे काम उशिरापर्यंत सुरू होते. तर, महिलेच्या मृतदेहाचे रेवदंडा प्राथमिक आरोग्य पान २ वर

# ३५ कोटींचे ड्रग्ज जप्त



### दोघा आरोपींना घेतले ताब्यात

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल रेल्वे स्थानकावर नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो म्हणजेच अमली पदार्थ नियंत्रण विभागाने मोठी कारवाई करत सुमारे ३.५ किलोचे ड्रग्ज जप्त केले आहे. मंगला एक्स्प्रेसमधून प्रवास करणाऱ्या दोन प्रवाशांकडून हे ड्रग्ज शुक्रवारी सकाळी जप्त करण्यात आले आहे. खाण्याच्या पुड्यामध्ये हे ड्रग्ज ठेवण्यात आले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, ही कारवाई गोपनीय माहितीनुसार करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या ड्रग्जची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत जवळपास ३५ कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे सांगितले जात आहे. ही कारवाई केल्यानंतर ड्रग्ज रेल्वे सुरक्षा दलाच्या ताब्यात देण्यात पान २ वर

# कंत्राटी वीज कामगाराचा शॉक लागून मृत्यू

| चिरनेर | प्रतिनिधी |



उरण तालुक्यातील चिरनेर येथील कंत्राटी वीज कामगार महेंद्र (मयूर) रामचंद्र पाटील (४८) यांचा विजेचा शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना बुधवारी (दि.१६) जुलै रोजी दुपारच्या सुमारास रानसई येथे घडली आहे. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तिधाम स्मशानभूमीत गुरुवारी (दि.१७) रोजी दुपारच्या सुमारास मोठ्या जनसमुदायाच्या उपस्थितीत अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

महेंद्र पाटील हे कंत्राटी वीज कामगार म्हणून कार्यरत होते. बुधवारी ते रानसई येथे विद्युत खांबावर वीज दुरुस्तीचे काम करत असताना, त्यांना विजेचा जोरदार धक्का लागला. त्यामुळे त्यांना नवी मुंबई येथील अपोलो हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू करण्याआधीच त्यांची प्राणज्योत मालवली. महेंद्रच्या मृत्यूचे वृत्त समजताच पत्नी, मुले आणि वडिलांनी हंबरडाच फोडला. त्यांना हे पहाडाएवढे पान २ वर

# शासनाकडून घरकुल लाभार्थींची कुचेष्टा?

## वाळू नसणाऱ्या ठिकाणचे दिले परमिट

| तळा | प्रतिनिधी |

शासनाने घरकुल लाभार्थ्यांना ‘पाच ब्रास वाळू मोफत’ या नावाने दिलेले परमिट म्हणजे लाभार्थ्यांची कुचेष्टा म्हणावी लागेल, अशी वस्तुस्थिती आहे. कारण, ज्या ठिकाणचे वाळूच परमिट दिले आहे, त्याठिकाणी वाळूच उपलब्ध नाही, असे लाभार्थ्यांचे म्हणणे आहे. घरकुलांचे काम तळा तालुक्यात आणि परमिट दिलेय पेण तालुक्याचे. लाभार्थ्यांची ही एकप्रकारे कुचेष्टाच शासनाने चालविली असून, याबाबत नाराजी व्यक्त होत आहे.

तळातालुक्यातशासनाच्यावतीने प्रधानमंत्री घरकुल योजनेंतर्गत अनेक घरकुलांची कामे सुरू आहेत. यापैकी २६५ घरकुले लाभार्थ्यांना तळा महसूल विभागाच्यावतीने पाच ब्रासचे रॉयल्टीचे परवाने दिले आहेत. परंतु, हे परमिट पेण तालुक्यातील जांभुळ या भागातील दिले आहेत. मात्र, या ठिकाणी वाळू उपलब्ध नाही. ही नदी खूप खोल असल्याने लाभार्थ्यांना ही वाळू पावसात काढणे कठीण आहे. शिवाय, पेण आणि तळा हे अंतर पाहता, गाडी भाडेसुद्धा न परवडणारे असे आहे. ही बाब लक्षात घेऊन रायगड जिल्हाधिकारी यांनी तळा तालुक्यात असलेल्या



खाडी पट्ट्यात रहाटाड, मांदाड या भागात हे परमिट बदलून दिल्यास ते या लाभार्थ्यांना अंतर जवळ पडेल. याशिवाय वाळू हातपाटीने काढणे अन् प्रवास भाडेही परवडेल, अन्यथा एवढ्या लांबून ही मोफत वाळू कुणीही आणायला धजावणार नाही. याचा शासकीय वरिष्ठ पातळीवर विचार होणे अत्यंत गरजेचे आहे.

सध्या पाऊस असल्याने वाळू मोठ्या पाण्यात मनुष्यबळाने काढणे शक्य नाही. त्यासाठी दिलेले परमिट हे १० जुलै ते १० ऑगस्ट २०२५ या कालावधीसाठी दिले आहेत. पाऊस आणि पुढे गणपती सणात अवजड गाड्यांना बंदी असल्यामुळे त्यांची मुदत वाढवून मिळावी, अशीही मागणी होत आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार

| नेरळ | प्रतिनिधी |



नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका पडीक बंगल्यात दोन विधिसंघर्षित बालकांनी एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्याची घटना घडली. याबाबत नेरळ पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून, त्या दोन्ही विधिसंघर्षित बालकांना बालसुधारगृहात पाठवण्यात आले आहे.

जून महिन्यापासून ते ५ जुलैपर्यंत हा प्रकार घडत होता. दोन अल्पवयीन बालकांनी इंस्टाग्राम या सोशल मीडिया एकाऊंटवरुन मैत्री केली. दोघा मित्रांनी त्या १३ वर्षीय तरुणीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर एका पडीक बंगल्यावर बोलवून पीडित अल्पवयीन असल्याचे माहिती असतानादेखील तिच्याशी जबरदस्तीने अतिप्रसंग केले व त्याचे चित्रीकरण केले. त्यानंतर पीडितेस धमकावले व बाहेर कोणाला सांगितले तर हे सर्व चित्रीकरण सोशल मीडियावर व्हायरल करू, अशी धमकी तिला वारंवार देण्यात येत होती. अखेर पीडित मुलीने आपल्या आईला घडलेल्या प्रकाराबाबत सांगितल्यावर, ही बाब अखेर उघडकीस आली.

नेरळ पोलीस ठाण्यात पीडितेच्या नातेवाईकांनी प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांना ही बाब सांगितली. क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी टीम तयार करून त्या अल्पवयीन पान २ वर

# गांजा तस्करास मुंबई विमानतळावरुन अटक

**मुंबई :** बँकॉकहून मुंबईत गांजा तस्करी करणाऱ्या एका प्रवाशाला सीमाशुल्क विभागाने मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर अटक केली आहे. अधिकाऱ्यांनी प्रवाशाच्या ट्रॉली बॅगेतून १.४५ कोटी रुपयांचा गांजा जप्त केला आहे. साबिथ मम्मुहाजी असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून, त्याची पुढील चौकशी सुरू आहे. बँकॉकहून मुंबईत गांजाची तस्करी होत असल्याची गुप्त माहिती सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे अधिकाऱ्यांनी सापळा रचला. साबिथच्या हालचाली संशयास्पद आढळल्याने अधिकाऱ्यांनी त्याला ताब्यात घेत त्याच्या सामानाची तपासणी केली असता गांजा आढळून आला.

# आव्हाडांवर गुन्हा दाखल

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर मुंबईतील



मरीन ड्राइव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरुवारी महाराष्ट्र विधानभवन परिसरात भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या राड्यानंतर पोलिसांनी आव्हाड यांच्या कार्यकर्त्याला अटक केली. यावेळी जितेंद्र आव्हाड आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी पोलिसांच्या गाडीसमोर बसून आंदोलन केलं. याप्रकरणी मुंबई पोलिसांनी जितेंद्र आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# अधिवेशन काळात आमदार, स्वीय सहाय्यकांनाच प्रवेश

## विधानसभा अध्यक्ष नार्वेकरांची घोषणा

| मुंबई | प्रतिनिधी |

महाराष्ट्र विधानसभेच्या आवारात गुरुवारी (दि. १७) झालेल्या हाणामारीमुळे विधानसभेची बदनामी झाली आहे. हे आटोक्यात आणण्यासाठी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी संसदेच्या नीतिमत्ता समितीच्या धर्तीवर विधान परिषदेच्या अध्यक्षांशी चर्चा केल्यानंतर येथेही अशीच एक समिती स्थापन केली जाईल, अशी घोषणा केली. यासोबतच त्यांनी हेदेखील स्पष्ट केले की, पुढील अधिवेशनापासून फक्त विधिमंडळाचे सदस्य, त्यांचे स्वीय सहाय्यक आणि सरकारी अधिकारीच विधानमंडळाच्या आवारात प्रवेश करू शकतील.



इतर कोणत्याही व्यक्तीला आवारात प्रवेश दिला जाणार नाही.

गुरुवारी या घटनेत सहभागी असलेल्या एका व्यक्तीने आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासोबत आणि दुसऱ्याने आमदार गोपीचंद पडळकर यांच्यासोबत प्रवेश पासशिवाय विधानसभा परिसरात बेकायदेशीरपणे प्रवेश केला होता. यावर पान २ वर

### आंबेनळी घाटरस्ता १५ ऑगस्टपर्यंत बंद | घाटरस्ता बंदीसाठीचे प्रयत्न वाढणार?

# ‘हेजार्डस केमिकल वेस्ट’चा रूंदीकरणासाठी वापर?

| शैलेश पालकर |
| पोलादपूर |

पोलादपूर-महाबळेश्वर-वाई-सुरूर रस्त्यावरील आंबेनळी घाटामध्ये ११ जुलैरोजीसुरूझालेली घाटरस्ताबंदीची अधिसूचना घाट सुरू होण्यापूर्वीच १५ जुलैपासून १५ ऑगस्टपर्यंत वाढली आहे. या नवीन अधिसूचनेमध्ये अवजड वाहनांपुरती बंदी ठेवून एलएमव्हेईकल आणि कार तसेच तत्सम कमी वजनाच्या वाहतुकीला अनुकूलता दर्शविण्यात आली असली तरी आंबेनळी घाटरस्ता दुरूस्तीऐवजी बंदीसाठीचे प्रयत्न वाढणार असल्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, बंदी कालावधीमध्ये भरावाच्या बहाण्याने हेजार्डस केमिकल वेस्ट लालमातीखाली गाडून आंबेनळी घाटाचे रूंदीकरण करण्यात येणार असल्याची कुजबूज सुरू आहे.

पोलादपूर महाबळेश्वर ते वाई सुरूररस्तामहाराष्ट्रस्टेटइन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या ताब्यात गेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पोलादपूर उपविभागीय कार्यालयांतर्गत क्षेत्रात असलेल्या महाबळेश्वर-वाई ते सुरूर रस्त्याच्या आंबेनळी घाटातील रूंदीकरणास सुरूवात झालेल्या रस्त्यापैकी पोलादपूर तालुक्यातील रायगड जिल्ह्यातील साधारणतः २४.२००कि.मी. पान २ वर



### प्रशासनाला गांभीर्य नाही; जनतेतून संताप व्यक्त

**पावसाला सुरूवात झाल्यानंतर पर्यावरण दिवशीच आंबेनळी घाटातील कुंभळवणे गावातील दरीभागात केमिकल वेस्ट आणि रासायनिक घनकचऱ्यासह रिॲक्टर ॲशची पोती टाकण्यात आल्याच्या घटनेनंतर प्रशासनाने याबाबत कोणतीही भूमिका गांभिर्याने घेतली नव्हती. यामुळे आंबेनळी घाटरस्ता दुरूस्तीच्या बहाण्याने अवजड वाहनांतून अशाच प्रकारची हेजार्डस केमिकल वेस्ट वाहून नेऊन त्यावर जेसीबीने मातीचे ढिगारे टाकून गाडण्यात येत भराव केला जाण्याची साशंकता व्यक्त होत आहे. यामुळेच दरडप्रवण असल्याच्या वस्तुस्थितीसोबत रूंदीकरण करण्याच्या बहाण्याने सध्या छोट्या व हलक्या वाहनांसाठी सुरू असलेला आंबेनळी घाटरस्ता लवकरच काही काळ सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचे संकेत प्राप्त होत आहेत.**

# ओसाड जमीन लागवडीखाली

## • आदिवासी बांधवांकडून भातपिकाची लागवड

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

**अलीकडे वाढती मजुरी, मजुरांचा अभाव आणि निसर्गाच्या अनियमितपणा यामुळे बहुतांशी शेतकऱ्यांनी शेतीकडे दुर्लक्ष केले आहे. मात्र आदिवासी बांधवांनी चिरनेर परिसरातील नागरिकांच्या ओसाड शेतजमिनीत भातरोपांची लागवड करून या ओसाड जमिनी लागवडीखाली आणल्या आहेत. पोटाची भूक भागविणाऱ्या काळ्या आईला महत्व देऊन, या ओसाड जमिनीत भात लागवड करून चिरनेर परिसरातील आदिवासी बांधवांनी समाजातील शेतकऱ्यांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे.**



वर्षाचे बारा महिने मोलमजुरी करून पोटाची खळगी भरणारा हा समाज अलीकडे विकासाच्या मुख्य प्रवाहात येत असून, त्यांना अन्नाचे महत्त्व काय असते हे समजले आहे. दरम्यान चाणजे ता. उरण येथील शेतकरी ज्ञानेश्वर शांताराम म्हात्रे यांच्या शेतावर गुरुवारी (दि.१७) रोजी आदिवासी बांधवांच्या कृतीतून, पट्टा पद्धतीने भात लागवड करून, आदिवासी बांधवांना तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली उरणच्या कृषी अधिकाऱ्यांनी पट्टा पद्धतीच्या लावणीचे व चारसूत्री लावणी पद्धतीचे महत्त्व पटवून दिले आहे. शेतात रासायनिक खतांचा वापर न करता नत्र निर्मितीसाठी गिरीपुष्प झाडाचा पाला तसेच हिरवळीची खते वापरा असा सल्ला कृषी अधिकाऱ्यांनी देत, उत्पन्न वाढीचे महत्त्व पटवून दिले. पट्टा पद्धतीची लागवड व चारसूत्रीच्या लागवडीमुळे उत्पन्नात कशी वाढ होते. याविषयीचे मार्गदर्शन करून, युरिया ब्रिकेट खतांच्या वापराविषयीदेखील माहिती यावेळी दिली.

यावेळी तालुक्यातील आदिवासी वाड्यातील आदिवासी बांधवांनी पट्टा पद्धतीच्या भात लागवडीच्या प्रात्यक्षिकात भाग घेतला होता. त्यांना कृषी विभागाचे मंडळ कृषी अधिकारी एस.डी गटकळ, उपकृषी अधिकारी ए.डी. बरकूल तसेच सहाय्यक कृषी अधिकारी आदिका पानसरे यांनी मार्गदर्शन व प्रात्यक्षिके करून दाखविली.

## भिरा फाटा ते सुतारवाडी रस्ता उखडला



**●रस्त्यावर जागोजागी खड्डे, अनेक ठिकाणी भेगा**

**| सुतारवाडी | प्रतिनिधी |**

वरसगावपासून सुतारवाडीमार्गे या दहा किलोमीटर अंतराच्या रस्त्याची दुरवस्था झाली असून, जागोजागी लहान मोठे खड्डे पडले आहेत. या रस्त्याच्या कामाबाबत आता जनतेतून शंका व्यक्त करण्यात येत आहे.

भिरा फाट्यावरून सुतारवाडीमार्गे पुण्याकडे जाण्यासाठी जवळचा मार्ग असल्यामुळे या मार्गावरून रात्रंदिवस अनेक लहान-मोठी वाहने धावत असतात. तसेच विले भागाळे या ठिकाणी अनेक कंपन्या आहेत. या कंपन्यांमध्ये कच्चा माल नेण्या-आणण्यासाठी ट्रेलर सातत्याने धावत असतात. त्याचप्रमाणे सुतारवाडी परिसरामध्ये अनेक फार्महाऊस असल्यामुळे वर्षाचे बाराही महिने सातत्याने पर्यटक येत असतात. वाहनांच्या सतत ये-जा करण्याने येथील सुस्थितीत असलेला रस्ता यावर्षी मात्र उखडलेला दिसत आहे. जागोजागी लहान-मोठे खड्डे पडले आहेत. किमान गणपती सणाअगोदर ज्या ज्या ठिकाणी खड्डे उखडलेले आहेत, ते खड्डे बुजवण्याची व्यवस्था संबंधित खात्याने करावे, अशी नागरिकांची मागणी आहे.

# शिक्षकांचे ११ ऑगस्टपासून आमरण उपोषण

**| उरण | प्रतिनिधी |**

जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालय, शेवा येथील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा संयम अखेर सुटला आहे. सातवा वेतन आयोग लागू न करणे, सहाव्या वेतन आयोगानुसार जुलै २०१९ पासूनची वार्षिक वेतनवाढ आणि महागाई भत्त्याचा थकवा सात वर्षे न दिला गेल्याने या कर्मचाऱ्यांवर अन्यायाचा डोंगर कोसळला आहे. याबाबत अनेकवेळा निवेदने दिली गेली, परंतु प्रशासकीय यंत्रणेने दुर्लक्ष केल्याने अखेर कर्मचाऱ्यांनी ११ ऑगस्ट २०२५ पासून विद्यालयाच्या गेटसमोर शांततापूर्ण आमरण उपोषण करण्याचा ठाम निर्णय घेतला आहे.

यासंदर्भात विभागीय शिक्षण उपसंचालक, चर्नीरोड, मुंबई यांना देण्यात आलेल्या निवेदनात कर्मचाऱ्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, गेल्या अनेक वर्षांपासून शासन निर्णय, उच्च न्यायालयाचे आदेश, जिल्हाधिकाऱ्यांचे पत्रव्यवहार, मुख्यमंत्री कार्यालय आणि पंतप्रधान कार्यालयात केलेले अर्ज, शिक्षण संचालक व अन्य अधिकाऱ्यांना पाठवलेली स्मरणपत्रे यांचे सगळे संदर्भ असूनही अजूनपर्यंत कोणतीही ठोस कृती झालेली नाही.

रूस्तोमजी केरावाला फाऊंडेशन या संस्थेने शाळा हस्तांतरण स्वीकारले असले तरी आजतागायत ना थकीत वेतन, ना वेतनवाढ, ना महागाई भत्ता दिला. उलट, सहा कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले. त्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयाने अंतरीम आदेश दिला तरीही अन्याय थांबलेला नाही.

शिक्षक व कर्मचाऱ्यांचे मानसिक आणि आर्थिक खच्चीकरण सुरुच आहे. शाळेच्या शालेय समितीत आवाज उठवूनही प्रशासनाने डोळेझाकच केली. परिणामी, प्रचंड असंतोष आणि नाराजी निर्माण झाली आहे. गेल्या सात वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांची अंमलबजावणी होत नाही, म्हणूनच ११ ऑगस्टपासून शाळेच्या गेटसमोर शांततापूर्ण, लोकशाही मार्गाने आमरण उपोषण सुरु करण्यात येणार आहे. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासनाचीच राहील, असा इशाराही कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

या लढ्याच्या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने हस्तक्षेप करून न्याय द्यावा, अशी मागणी सर्वच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांतून होत आहे. अन्यथा, हे आंदोलन फक्त उपोषणापुरते मर्यादित न राहता मोठ्या संघर्षात परिवर्तीत होईल, यात शंका नाही.

## प्रा. अनुपमा कांबळे यांना पीएचडी प्रधान



**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाच्या भूगोल विभागातील प्रा. अनुपमा राजकुमार कांबळे यांनी आपल्या शैक्षणिक कार्याचा एक नवा शिखर गाठला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्यातर्फे त्यांना भूगोल विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. दौंड तालुक्यातील ग्रामीण विकासावर दुग्ध व्यवसायाचा सामाजिक-आर्थिक परिणाम, पुणे (महाराष्ट्र) या विषयावर त्यांनी सखोल आणि अभ्यासपूर्ण संशोधन केले. या संशोधन प्रक्रियेमध्ये त्यांना एसपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील वामनराव गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

# रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघाताचा धोका

**| कोलाड | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरुन कोलाड हायस्कूल कोलाडकडे जाणाऱ्या रस्त्याचे तीनतेरा वाजले असून, रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता, अशी या रस्त्याची अवस्था झाली आहे. यामुळे या मार्गाने प्रवास करणारे विद्यार्थ्यांसह रहिवासी नागरिक तसेच प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.



**■ कोलाड हायस्कूलकडे जाणाऱ्या रस्त्याचे तीनतेरा**

**■ विद्यार्थ्यांसह रहिवासी नागरिकांचे हाल**

या मार्गावर प्राथमिक मराठी केंद्र शाळा, द.ग. तटकरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रहिवासी वस्ती तसेच मधून जवळचा मार्ग असल्यामुळे धाटाव एमआयडीसीमध्ये कामावर जाणारे असंख्य गावातील कामगार याच मार्गाने ये-जा करीत असतात. गेली दोन ते तीन वर्षांपासून या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. तसेच हा रस्ता अरुंद असल्यामुळे मार्ग काढताना प्रवाशांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. यामुळे या मार्गावर अपघात होताना दिसत आहेत. काही दिवसापूर्वी या मार्गानी दुचाकीवरून प्रवास करणारा धाटाव एमआयडीसीकडे जाणारा कामगार खड्ड्याचा अंदाज न आल्यामुळे दुचाकी स्लिप होऊन खाली पडला, परंतु सुदैवाने तो थोडक्यात बचावला. रस्त्याच्या दुरवस्थेबाबत नागरिकांमधून संताप व्यक्त करण्यात येत असून, संबंधित विभागाने तात्काळ लक्ष घालावे, अशी मागणी होत आहे.

# माणगाव टीएमसी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

**| माणगाव | प्रतिनिधी |**

जे.बी. सावंत एजुकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज माणगाव येथे शुक्रवारी (दि. १८) शैक्षाणिक वर्ष २०२५-२६ करिता प्रथम वर्ष बीकॉममध्ये प्रवेश घेतलेल्या नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत संस्थेतर्फे केक कापून व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.

यावेळी संस्थेचे सचिव नानासाहेब सावंत यांच्या हस्ते फीत कापून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. नानासाहेब सावंत यांनी प्रथम वर्ष बीकॉममध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व नवोदित विद्यार्थ्यांचे आपल्या मनोगतातून सुरुवातीलाच संस्थेतर्फे स्वागत केले. ते पुढे म्हणाले, मुलांनो नेहमी कॉलेजला या,खूप अभ्यास करा, मोठे व्हा, चांगल्या पदावर नोकरीला लागा. आपल्या आई- वडिलांचे स्वप्न असते की, आपल्या मुलांनी खूप शिकून मोठे होऊन चांगल्या ठिकाणी नोकरीला लागावे. आई-वडिलांचे हे स्वप्न साकारण्यासाठी त्यांची मेहनत लक्षात घेऊन मुलांनी खूप अभ्यास करणे आवश्यक आहे.

या कार्यक्रमास संस्थेचे सदस्य रामदास पुराणिक, प्रा. अशोक मोरे, डॉ. नितीन मुटकुळे, प्रा. जगदीश शिगवण, ग्रंथपाल अमित बाकाडे, प्रा. भारत पवार, प्रा. सायगावकर, मुख्य लिपिक दिलीप ढेपे, सर्व शिक्षक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृतीय वर्ष बीकॉमची विद्यार्थिनी अनिषा शिंदे यांनी करून प्रा. अशोक मोरे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# मापुस्करांच्या ‘छंद माझा गिरिशिखरांचा’ पुस्तकाचे प्रकाशन

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

मला नवीन पिढीला ‘छंद माझा गिरिशिखरांचा’ या पुस्तकाद्वारे असा संदेश द्यायचा आहे की, आपल्या भारत देशात बघण्यासारखा अनेक गोष्टी आहेत. कोकणातील हिरवागार निसर्गरम्य परिसर, समुद्र किनाऱ्यापासून हिमालयातील माऊंट एव्हरेस्टपर्यंत आपला भारत देश सुजलाम्, सुफलाम् आहे.




त्याला पुरातन सांस्कृतिक वारसा लाभला आहे. या सर्व परिसरात जास्तीत जास्त पर्यटन करून आपला आणि आपल्या कुटुंबियांचा ताण नाहीसा करुन शारीरिक आणि मानसिक आनंद निर्माण करा. त्यामुळेच तुमचे जीवन आनंदी होऊन तुमच्या काम करण्याच्या क्षमतेत आपोआपच वाढ होईल, असे उद्गार श्रीवर्धन येथील अजित मापुस्कर यांनी आपल्या छंद माझा गिरिशिखरांचा या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यावेळी काढले.

सदर पुस्तक आत्मकथन नसून आत्मानुभवांचे यथोचित संकलन आहे. प्रत्येक माणसाचे जीवन ठरावीक चाकोरीतून मार्गक्रमण करत असते. आवड, जगण्यात अनुभवलेले सोनेरी क्षण निरनिराळ्या ट्रेकच्या प्रसंगांच्या कथनाद्वारे आनंददायी आणि स्मरणीय आहे. हिमालयातील ट्रेकची साद्यंत माहिती, भारतीय प्रदेश, संस्कृती, रितीरिवाज, पोशाख, राहणीमान, हवामान, गावांची नावे, आलेले बरे-वाईट अनुभव हे सारेच वाचनीय आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, फिटनेस, पत्नी आणि मुलांची साथ, योग्य माहिती, आयोजन हेही गरजेचे आहे. पुढील पिढीत हिमालयात जाणाऱ्या पर्यटकांना हे सचित्र पुस्तक मार्गदर्शक ठरेल, असे मापुस्कर यांनी सांगितले.

गुरुवार, दि. १७ जुलै रोजी सायंकाळी पाच वाजता श्रीवर्धन येथील माळी समाज सभागृहात पार पडलेल्या कार्यालयास शिवछत्रपती,जीवन गौरव तसेच पद्मश्री पुरस्कार प्राप्त उदय देशपांडे, एव्हरेस्ट शिखर मोहीम १९९८ प्रमुख ऋषिकेश यादव, पुस्तकाचे प्रकाशक तसेच उद्वेली बुक्सचे विवेक मेहेत्रे, गिरीमित्र किरण देशमुख हे मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची प्रस्तावना शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त अशोक मापुस्कर व सूत्रसंचालन अविनाश कोसबे यांनी केले. यावळी मापुस्कर यांचे कुटुंबीय व मित्र मंडळ उपस्थित होते.

## पान १ वरून

### एसटी बसने महिलेला चिरडले

केंद्रात शवविच्छेन करण्यात आल्यानंतर तो कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आला. एसटी बसच्या वाढत्या अपघातांमुळे सर्वसामान्य नागरिकांमधून चिंता व्यक्त करण्यात आली असून, एसटीचा प्रवास सुरक्षित याविरोधात संताप व्यकत करण्यात येत आहे. वाढते अपघात रोखण्यासाठी पावले उचलण्याची गरज व्यक्त करण्यात येत आहे.

### ३५ कोटींचे ड्रग्ज जप्त

आले असून, पुढील तपास सुरू आहे. ताब्यात घेतलेल्या प्रवाशांचा कोणत्या टोळीशी याचा संबंध आहे, तसेच कोणाला अटक झाली आहे का, याबाबत अद्याप अधिकृत माहिती मिळालेली नाही. मात्र, अमली पदार्थ नियंत्रण विभाग आणि रेल्वे पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

पनवेल रेल्वे स्थानकावर अशा प्रकारचे मोठ्या प्रमाणात ड्रग्ज जप्त होणे ही गंभीर बाब मानली जात आहे. शहरातील ड्रग्ज नेटवर्कचा मागोवा घेण्यासाठी तपास यंत्रणा सज्ज झाली असून, या कारवाईमुळे ड्रग्ज रॅकेट उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### हेजार्डस केमिकल वेस्टचा रूंदीकरणासाठी वापर

रस्ता येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीमध्ये असताना आंबेनळी घाटातील ब्रिटीशकालीन पुलांना दोन्ही बाजुंनी काँक्रिटचे जॅकेट बांधून पूल टिकविण्याचा प्रयत्न झाला, दरीच्या बाजूने रुंदीकरण करण्यासाठी डोंगर उभे कापून मातीचा भराव करण्यात आला, मोठमोठी झाडे आणि अनेक वर्षांपासूनची झाडे तोडण्यात आली. देखभाल दुरूस्ती तसेच संरक्षक कठडे आणि डोंगरउताराच्या बाजूने रूंदीकरण, डांबरीकरण तसेच साईडपट्टयांचे मजबूतीकरण आदी कामे सातत्याने सुरू राहिली. २१ जुलै २०२१च्या अतिवृष्टीमुळे आंबेनळी घाट अनेक ठिकाणी दरडी कोसळून वाताहत झाल्यानंतर या रस्त्याच्या कायमस्वरूपी मजबुतीकरणासाठी महाराष्ट्र स्टेट इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या ताब्यात हा संपूर्ण आंबेनळी घाटरस्ता सोपविण्यात येऊन सातारा बाजूने या रस्त्याच्या कामास सुरूवात करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील पोलादपूर शहर, कापडे बुद्रुक ग्रुपग्रामपंचायती अंतर्गत रानबाजिरे, काटेवाडी, सिध्दार्थनगर,भराववाडी, कापडे कमानीचा परिसर तसेच आड, चांभारगणी, कुंभळवणे, पायटे, दाभिळटोंकपर्यंतच्या या २४.२००कि.मी. रस्त्याचे रूंदीकरण होण्याची शक्यता दिसून येत आहे. याबाबत महाराष्ट्र स्टेट इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशनमार्फत कोणताही दुजोरा देण्यात आला नसला तरी आजमितीस रस्त्याची मोजणी व अन्य कामांना सुरू झाली आहे.

पोलादपूर महाबळेश्वर रस्त्याच्या सुधारणेचे काम कंत्राटदार आरपीपी-एसआयपीएल (४) यांच्यामार्फत हाती घेण्यात आले असून सद्यस्थितीत काम प्रगतीपथावर आहे. हा रस्ता पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाटातून जात असून, पायटा गावापासुन महाबळेश्वरकडे जाताना १ कि.मी. अंतरावर दरडप्रवण क्षेत्रात गुरूवारी दि.१० जुलै रोजी जोराचा पाऊस पडल्यामुळे डोंगरावरील दगड गोठे व माती रस्त्यावर आली. याठिकाणचे माती व दगड गोटे जेसीबीच्या सहाय्याने काढण्याचे काम कंत्राटदारांमार्फत प्राधान्याने चालू आहे. या दरडप्रवण क्षेत्रामध्ये अजून माती व दगड येण्याची शक्यता असून, ते काढण्यास ४ ते ५ दिवस लागणार असल्याने पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे यांनी महाबळेश्वर तहसीलदार सचिन मस्के यांना दूरध्वनीद्वारे वाहतुकीसाठी महाबळेश्वर ते पोलादपूर रस्ता बंद ठेवण्याची सूचना केली आणि यादरम्यान गुरुवारी दुपारनंतर पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे आणि तहसीलदार घोरपडे यांनी कर्मचाऱ्यांसमवेत दरडप्रवण क्षेत्रामध्ये वाहतूक सुरळीत राहण्यासाठी वाहनचालकांना मार्गदर्शन केले.

मात्र, १४ जुलै रोजी आंबेनळी घाटातील वाहतूक सुरळीत होण्याची शक्यता निर्माण झाली असताना अचानक सोमवार दि. १५ जुलै २०२५ रोजी पुन्हा अतिवृष्टीमुळे आंबेनळी घाटामध्ये ५-६ ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटनांमुळे रायगड जिल्हाधिकारी कार्यालयातून जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या स्वाक्षरीनिशी पुन्हा नवीन अधिसूचना काढण्यात येऊन अवजड वाहनांना घाटरस्त्यावरून वाहतुकीस बंदी कायम ठेवून छोट्या वाहनांसाठी अतिदक्षतेसह वाहतुकीची मुभा देण्यात आली आहे. याबाबत पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांनी छ.शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यालगत महाबळेश्वर रस्त्यावर बॅरिकेटस् लावून मोठ्या वाहनांना आंबेनळी घाटातून प्रतिबंध असल्याचे दर्शविले आहे.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

मुलीची चौकशी केली. त्यानंतर पोलिसांनी कारवाई करताना दुसऱ्या मुलाचा शोध घेऊन त्यालाही ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर प्रकरणाची चौकशी अत्यंत संवेदनशीलतेने केली जात असून, दोन्ही बालकांसाठी चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्या विधिसंघर्षित बालकांची मनोपचार तज्ञ् यांच्याकडून चौकशी सुरु आहे.

### कंत्राटी वीज कामगाराचा शॉक लागून मृत्यू

दुःख पचविणे अवघड गेले आहे. महेंद्र पाटील यांच्या आईचे काही वर्षांपूर्वी निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, वडील असा आप्त परिवार आहे. महेंद्र पाटील हे मागील ३० वर्षांपासून कंत्राटी वीज कामगार स्वरूपात महावितरण कंपनीचे काम करत होते. या दुर्दैवी घटनेने कुटुंबियांवर आभाळच कोसळले आहे. महावितरण कंपनीने त्यांना भरीव स्वरूपात आर्थिक मदत करावी, अशी मागणी चिरनेर येथील नागरिकांनी केली आहे.

### अधिवेशन काळात आमदार, स्वीय सहाय्यकांनाच प्रवेश

सभापतींनी दोन्ही आमदारांना सभागृहात माफी मागण्याचे सुचवले. दोन्ही सदस्यांनी याबद्दल दिलगिरी व्यक्त केली. हाणामारीत सहभागी असलेल्यांपैकी एक जण आव्हाड यांच्यासोबत होता, तर उर्वरित सहा ते सात जण पडळकर यांच्यासोबत आले होते. या सर्वांविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यांच्यावर विशेषाधिकार उल्लंघनाची कारवाई देखील सुरू केली जाईल. त्या दोघांनाही पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. नितीन देशमुख आणि सर्जेराव टकलेला पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यांना सोमवारपर्यंत पोलीस कोठडीत पाठवण्यात आले आहे. दोन्ही कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल आहेत.

## वीजचोरी महागात, तिघांवर गुन्हा

**आगरदांडा :** नांदगाव विभागात वीजचोरी करणाऱ्या ग्राहकास पकडले असता महावितरण कर्मचाऱ्यांना तुमचे हातपाय तोडून टाकेन, जीवे ठार मारण्याची धमकी व धक्काबुक्की केल्याप्रकरणी नांदगाव येथील एक अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुरुड महावितरणमधील कर्मचारी नांदगाव विभागातील सुरुळपेठ, खरीकवाडा व अन्य भागात फिरून वीजचोरी पकडत होते. यासाठी ते घरामध्ये असणारे मीटर तपासात होते. त्यांनी नांदगाव परिसरात एका वीज मीटरची तपासणी केली असता त्यांना तिथे वीजचोरी लक्षात आली. तेव्हा त्यांनी ते वीज मीटर काढून घेतले व त्या घरातील वीज वापर कसा आहे याचा तपास सुरू केला; परंतु झालेला प्रकार वीजचोरी करणाऱ्या व्यक्तीस न आवडल्याने त्यांनी दमदाटी करून ते मीटर पुन्हा बसण्यास भाग पाडले.सर्व कर्मचाऱ्यांना जिवेठार मारण्याची धमकी देऊन अडथळा निर्माण केला. याप्रकरणी मुरुड महावितरण विभागाने मुरुड पोलीस ठाण्यात रितसर तक्रार नोंदविण्यात आली आहे.

# गरजू मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप

**● यशवंत ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या औचित्याने कार्यक्रम**

**| अलिबाग | वार्ताहर |**



उरण तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाचे सहचिटणीस रायगडभूषण यशवंत हरिश्चंद्र ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त प्राथमिक शाळा बोकडविरा इथेगरीबवगरजूविद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम शनिवार, दि. १९ जुलै रोजी सकाळी नऊ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी सभापती नरेश घरत, तालुका चिटणीस रवी घरत, उरण विधानसभा अध्यक्ष रमाकांत पाटील, महिला अध्यक्ष तथा माजी उपसभातपी वैशाली पाटील, बोकडविरा सरपंच अपर्णा मनोज पाटील, बोकडविरा ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी युवक संघटना नवघरचे अध्यक्ष प्रतीक किरण पाटील यांनी केले आहे.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## Tender Notice

Following Tenders are invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below-

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Estimated Cost (in Lakhs) | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/GRN/ e-Tender/ T-05/ 2025-26 | Design, shop test, supply, transport, fixing of L.T. spiral type PVC Spacers to L.T. Lines and allied works in the jurisdiction of Goregaon Division under Pen Circle. | 10.00 | 10,000/- | 1000+18 %GST= 1180/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in/ & can be downloaded from Dt. 19.07.2025 to Dt. 24.07.2025. Submission of Bid is up to Dt. 24.07.2025 till 23.55 Hrs. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Addl. Executive Engineer Tel No. 9029135601. M.S.E.D.Co.Ltd. Chinchavali, Goregaon, Tal: Mangaon Dist.-Raigad-402103.

PRO no. 213 — Executive Engineer, Goregaon Division

# मासेमारी हंगामाची लगबग

## बंदरात मच्छिमारांची बोट दुरुस्ती सुरू



| उरण | वार्ताहर |

दोन महिन्यांपासून बंद असलेली मासेमारी सुरू होण्यासाठी काही दिवसच उरले असल्याने उरणच्या बंदरात मच्छिमारांची बोटी दुरुस्तीची लगबग सुरू झाली आहे. दोन महिने विसावलेल्या बोटी १ ऑगस्टपासून खोल समुद्रात जाणार आहेत. त्यामुळे ससून डॉक, करंजा, मोरा, कसारा बंदरात बोटींची गर्दी वाढली आहे. तयारीसाठी कालावधी कमी असल्याने मच्छिमारांची बोटी दुरुस्ती व तयारी सुरू झाली आहे.

खोल समुद्रातील मासेमारीसाठी मच्छिमारांना ५० ते ७० वाव खोल समुद्रात जावे लागते. त्यासाठी एका ट्रिपसाठी १० ते १२ दिवस खर्ची घालावे लागतात. खोल समुद्रातील मासेमारीच्या एक ट्रिपसाठी दीड ते दोन लाखांपर्यंत खर्च येतो. समुद्राच्या तळाशी असलेली सर्वच प्रकारची मासळी या पद्धतीत पकडली जाते. चांगल्या प्रतीची निर्यात करण्यायोगी असलेली मासळी खोल समुद्रातील मासेमारीत मिळत असल्याने या पद्धतीच्या मच्छिमारांची संख्या राज्यात सर्वाधिक आहे. त्यामुळे ५० ते ७० वाव खोल समुद्रातील मासमारीसाठी २० दिवसांआधीपासून तयारी सुरू झाली आहे. बोटींच्या डागडुजी, रंगरंगोटी, जाळींची दुरुस्ती, इंजिन आणि इतर तत्सम कामे करण्यासाठी मच्छिमारांनी तयारी सुरू केली आहे.

पावसाळी ६१ दिवसांच्या बंदी नंतर एक ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या मासेमारीसाठी मच्छिमार तयार आहेत. यासाठी मच्छिमारांना शासनाकडून मिळणारा डिझेलचा कोटा वेळेतच उपलब्ध होणे आवश्यक आहे. यासाठी आतापासूनच बैठका घेऊन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. मात्र शासनाकडून वेळेत डिझेल कोटा मिळाला नाही तरी बाहेरून मिळणारे महागडे डिझेल खरेदी करून १ ऑगस्टपासून मासेमारीसाठी निघण्याची तयारीही मच्छिमारांची असल्याची माहिती मच्छिमार व्यावसायिकांनी दिली.

करंजा, मोरा, कोप्रोली आदी बंदरात मासेमारी बोटीची दुरुस्ती बोटीवरील जाळ दुरुस्ती, रंगरंगोटी तसेच इतर सुविधा निर्माण करण्यासाठी काम सुरू आहेत. उरणच्या या बंदरात एकूण ७०० पेक्षा अधिक बोटींची संख्या आहे. या बोटींवर मजूर ही आता परतू लागले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा येथील बंदर परिसर गजबजू लागले आहेत.

## मत्स्योत्पादनात २९ हजार टनाची वाढ



| रायगड | प्रतिनिधी |

राज्यातील मत्स्योत्पादनात २९ हजार १८४ टन वाढ झाली आहे. सन २०२३-२४ मध्ये ४ लाख ३४ हजार ५७५ टन होते, २०२४-२५ मध्ये ते वाढून ४ लाख ६३ हजार ७५८ टनवर पोहोचले आहे. गेल्या मासेमारी हंगामात मत्स्योत्पादनात मोठी घट झाल्याचे दिसून आली होती. मात्र हंगामात मत्स्योत्पादनात पुन्हा वाढ झाल्याने मत्स्यव्यवसायायिकांना दिलासा मिळाला.

गेल्या सहा वर्षात पहिल्यांदाच सर्वाधिक मत्स्योत्पादनाची नोंद या वर्षी झाली आहे. परप्रांतीय मासेमारी बोटींना राज्याच्या सागरी हद्दीत होणारी घुसखोरी रोखण्यात आलेले यश, पर्ससीन आणि एलईडी मासेमारी रोखण्यात यश आणि हवामानाने दिलेली साथ मच्छिमारांच्या पथ्यावर पडली आहे. राज्यातील मत्स्य उत्पादन वाढीचे प्रमाण ६.२९ टक्के आहे.

महत्वाची बाब म्हणजे कोकण किनारपट्टीवरील इतर जिल्ह्याच्या तुलनेत कोकणातील मत्स्य उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे. २०२३-३४ मध्ये ठाणे जिल्ह्यात २६ हजार ०५७ टन उत्पादन नोंदवले गेले होते. त्या तुलनेत २०२४-२५ मध्ये ठाण्यात ५४ हजार ४५७ टन मत्स्य उत्पादन झाले आहे. तर पालघर, मुंबई उपनगर, बृहन्मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या मत्स्योत्पादन साधारणपणे मागील हंगामाच्या तुलनेत १ ते २ हजार मेट्रीक टनची वाढ झाली आहे.

गेल्या काही वर्षात राज्यातील मच्छिमारांना विवीध प्रकाराच्या आव्हानांना तोंड द्यावे लागले होते. करोना काळातील टाळेबंदीमुळे मत्स्य व्यवसायावर परिणाम झाला होता. त्यानंतर निसर्ग आणि तौक्ते वादळांचा कोकण किनारपट्टीला तडाखा बसला होता. गेल्या हंगामातली हवामानातील बदलांचा फटका मासेमारी बसलो होता. मात्र यावर्षीचा हंगात हवामानाची साथ मिळाल्याने मच्छिमारांना मोठा दिलासा मिळाला. मत्स्य उत्पादन घटण्यामागे प्रामुख्याने नैसर्गिक आणि मानव निर्मित कारणे आहेत. नैसर्गिक कारणामध्ये हवामानात होणारे बदल, किनारपट्टीवर येणारी वादळे आणि प्रदूषण या घटकांचा समावेश आहे. तर परप्रांतीय नौकांकडून राज्याच्या सागरी हद्दीत केली जाणारी मासेमारी, एलईडी दिव्यांच्या सहाय्याने पर्ससीन नेटचा वापर करून मासेमारी या कारणांमुळे मासेमारीवर परिणाम होतो.

# निवडक



## आदिवासी महिलांना सहकार मार्गदर्शन

**नेरळ** : कर्जत तालुक्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी लोकवस्ती आहे आणि त्या आदिवासी समाजातील महिलांनी एकत्रित येऊन रोजगार निर्मिती करावी.यासाठी सहकारी संस्था स्थापन करण्याचे प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सहकार क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थांचे प्रतिनिधी यांनी महिलांना प्रशिक्षण दिले.कर्जत येथील गुड शेफर्ड संस्थेमार्फत आदिवासी महिलांना सहकारी संस्थेबाबत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते. त्यावेळी सहकारी संस्थाची देण्यासाठी डी दिनेश उपस्थित होते. त्यांनी सहकारी संस्था कशा बनवायच्या,त्या संस्था कशा चालवायच्या तसेच सहकारी संस्था यांना अर्थ साहाय्य बँकांच्या माध्यमातून कसे मिळते. सभासद कसे सहभागी करून घ्यावेत आणि कोणत्या निकषावर संस्था स्थापन केली जाऊ शकते. त्यासाठी सभासद यांना कोणते नियम असणार,कोणत्या निकषांचे आधारे सभासद वाढवायचे आदी अनेक विषयांवर मार्गदर्शन डी दिनेश यांनी केले. तर गुड शेफर्ड शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर रेसी यांनी आदिवासी महिलांसाठी सहकारी संस्थेचा उद्देशच हा महिला सक्षमीकरण हा आहे. त्यासाठी आदिवासी सहकारी संस्था यांना अर्थ साहाय्य करणारे अनेक पुढे येत आहेत. त्यामुळे आपली सहकारी जर सहकारी संस्था चालवत असेल तर त्याचा फायदा कर्ज लवकर मिळविण्यासाठी होऊ शकतो असे मार्गदर्शन केले.

## खारघर स्टेशनमधून दुचाकीची चोरी

**पनवेल** : केंद्रीय वस्तू व सेवा कर व केंद्रीय उत्पाद शुल्क विभागातून सेवानिवृत्त झालेल्या खारघर येथील कर्मचाऱ्याची खारघर रेल्वे स्टेशनच्या बाहेर पार्क केलेली दुचाकीची चोरी झाल्याची घटना घडली. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल केला असून पोलीस शोध घेत आहेत. खारघर सेक्टर २३ येथे राहत असलेले उमाशंकर लाल हे केंद्रीय वस्तू व सेवा कर व केंद्रीय उत्पाद शुल्क या विभागात काम करीत होते. सध्या उमाशंकर हे सेवानिवृत्त झालेले आहेत. उमाशंकर यांना नुकताच बोरीवली येथे वैयक्तिक कामासाठी जायचे असल्याने त्यांच्या मालकी असलेल्या होंडा कंपनीची ॲक्टिव्हा कंपनीची दुचाकी ही खारघर रेल्वे स्टेशन परिसरात मोकळ्या जागेत पार्किंग करून रेल्वेने बोरिवली येथे गेले होते. काम उरकून पुन्हा पार्क केलेल्या दुचाकीजवळ आले असता त्यांची दुचाकी सापडली नाही. त्यावेळी आपल्या दुचाकीची चोरी झाल्याचे लक्षात येताच उमाशंकर यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.



## पाण्यासाठी सिडको अधिकाऱ्यांना घेराव

**पनवेल** : गेल्या ४ महिन्यांपासून संपूर्ण कामोठे शहरात अनियमित आणि कमी पाणीपुरवठा होत असून सलग दोन दोन दिवस पाणी येत नसून नागरिक खूप त्रस्त आहेत. अजून पण सोसायटीमध्ये नियमित पाणी येत नाही आणि खूप कमी प्रमाणात पाणी येत आहे आणि दिवसातून फक्त १ ते २ तास पाणी येत आहे. याच्या निषेधार्थ आज शिवसेनापक्षातील कामोठे येथील शिवसैनिकांनी सिडको भवन येथे जाऊन सिडको अधिकाऱ्यांना घेराव घालून जाब विचारला. यावेळी बोलताना उपशहर प्रमुख सचिन मनोहर त्रिमुखे यांनी सांगितले की, गेल्या ४ महिन्यांपासून संपूर्ण कामोठे शहरात अनियमित आणि कमी पाणीपुरवठा होत आहे. अजून पण सोसायटीमध्ये नियमित पाणी येत नाही आणि खूप कमी प्रमाणात पाणी येत आहे आणि दिवसातून फक्त १ ते २ तास पाणी येत आहे. त्या संदर्भात अनेक तक्रारी येत असून रोज टँकरचे पाणी विकत घेण्याची वेळ आमच्यावर आली आहे. कामोठेमध्ये पाण्याचा प्रश्न सुटण्यासाठी सिडकोची कामोठेमध्ये एकच पाण्याची टाकी आहे त्यामुळे कधी पाण्याच्या टाकीचे काहीही काम निघाले कि, पाणी एक ते दोन दिवस कामोठे मध्ये पाणी येत नाही आणि कामोठे पहिले लोकसंख्या खूप कमी होती आता तीच लोकसंख्या दुप्पट झाली आहे. नागरिकांना खूप त्रास होतो तरी कामोठेमध्ये नवीन पाण्याची टाकीचे काम सुरु आहे. ते जलद गतीने करून नागरिकांना लवकरात लवकर पाणीपुरवठा सुरु करावा. पाणी सोडायची वेळ सकाळी आणि संध्याकाळी निश्चित ठेवावी, अन्यथा रायगड भवन येथे ३१ जुलै रोजी बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.



## स्थानिकांना नोकरीत प्राधान्य द्या

### एमआयडीसीला दिले निवेदन

| खांब | वार्ताहर |

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या वतीने आरआयआरसी धाटाव चेअरमन नांदगावकर यांच्याकडे रोहा तालुक्यातील स्थानिकांना नोकरीमध्ये ८० टक्के प्राधान्य मिळणेबाबत तसेच प्रत्येक कंपनीमध्ये २० टक्के मुलींची भरती करून नोकरीमध्ये प्राधान्य मिळावे यासाठी निवेदन देण्यात आले. जर कोणत्याही कंपनीमध्ये रोहा तालुक्याबाहेरील भरती केल्याचे आढळल्यास शिवसेना स्टाईलने उत्तर देण्यात येईल असेही सूचित करण्यात आले. यावेळी शिवसेना शाखा प्रमुख निलेश वारंगे, घोसाळे विभाग प्रमुख सचिन फुलारे, उपशाखा प्रमुख महेश खांडेकर, रमेश विचारे, धाटाव विभाग प्रमुख अमृता साळुंके, महिला संघटिका रोहिणी गोसावी, शाखा प्रमुख दीक्षिता वाघमारे, सुप्रिया वारंगे आदी उपस्थित होते.

## कर्जत फार्मर प्रोड्युसर कंपनीची स्थापना




| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील दुबार शेती करणाऱ्या राजनाला परिसरात शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी एकत्रित येत राजनाला फार्मर प्रोड्युसर कंपनी स्थापन केली आहे. शेतकऱ्यांनी आपल्यासाठी स्थापन झालेल्या शेतकरी प्रोड्युसर कंपनीचे शेअर्स खरेदी करण्याचे आवाहन केले आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी विकास महामंडळाचे व्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील व त्यांच्या संपूर्ण टिमने कर्जतमधील राजनाला कर्जत फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड यांच्या कार्यालयात भेट देऊन कार्यकारिणीतील अध्यक्षांसह पदाधिकारी व सदस्यांची भेट घेत कंपनीच्या कारभाराबाबत सविस्तर चर्चा करुन मार्गदर्शन केले.

कर्जतमधील राजनाला कर्जत फार्मर प्रोड्युसर कंपनीची विशेष बैठक पार पडली. त्याप्रसंगी शेतकऱ्यांनी उपस्थिती लावून कंपनीचा कारभार भविष्यात चांगल्या प्रकारे चालवता आला पाहिजे यासंदर्भात चर्चा झाली. राजनाला कर्जत फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेडच्या या विशेष बैठकीसाठी कर्जत येथील कार्यालयात महाराष्ट्र राज्य सहकारी विकास महामंडळाचे व्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील, राज्य समन्वयक साजिद मनेरी, बळवंत धुमाळ, जिल्हा समन्वयक श्रीराज म्हात्रे, कंपनीचे अध्यक्ष उत्तम शेळके, उपाध्यक्ष दया शेळके, सेक्रेटरी विनायक देशमुख, सचिव अजित पाटील, सहसचिव जयवंत आणि चार शेतकरी व शासन यांच्या माध्यमातून खेळते भागभांडवल या कंपनीत उपलब्ध झाल्यानंतर भविष्यात शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होईल त्यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांनी कंपनीचे शेअर्स विकत घेऊन या कंपनीत सहभाग नोंदवून काम केल्यास तालुक्यातील शेतकऱ्यांना आगामी काळात निश्चितच योग्य दिशा व त्यांची अर्थिक उन्नती होण्यास मदत होईल हा आत्मविश्वास शेतकऱ्यांना देण्यात आला.

राज्य सहकारी विकास महामंडळाचे व्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील यांनी फार्मर प्रोड्युसर कंपनी यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक सुबत्ता मिळू शकेल असा विश्वास व्यक्त केला.

## श्री साईबाबा मंदिरामध्ये चोरी

**पनवेल** : पनवेल शहरातील तक्का येथील श्री साईबाबा मंदिरामध्ये अज्ञात चोरट्याने दानपेटीची रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली असून सदर चोरी तेथे लावण्यात आलेल्या सी सी कॅमेरा मध्ये कैद झालेली आहे.

येथील श्री साईबाबा मंदिराचे लॉक तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून मंदिरातील दानपेटीतील रोख रक्कम अंदाजे ७ हजार रुपये ही घरफोडी चोरी करून घेऊन गेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



अलिबाग नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्ष स्व. ॲड. नमिता प्रशांत नाईक यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना अलिबाग तालुक्याच्या वतीने शेतकरी भवन अलिबाग येथे आदरांजली वाहण्यात आली. यावेळी अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत, माजी नगरसेविका वृषाली ठोसर, संजना किर, अलिबाग तालुका महिला आघाडी अध्यक्षा नागेश्वरी हेमाडे, अशोक प्रधान, नंदू तळकर, नागेश कुलकर्णी, पुरोगामी युवक संघटना अध्यक्ष विक्रांत वार्डे व इतर विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते, मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इसम बेपत्ता

**पनवेल** : राहात्या घरातून कोणास काहीएक न सांगता एक इसम कोठेतरी निघून गेला असून तो परत घरी न येता कोठेतरी हरविला असल्याने याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. श्रीनाथ टिकाराम भंडारी हे पंचशीलनगर झोपडपट्टी, पनवेल येथील रहिवासी असून त्यांची उंची ५ फुट ५ इंच, गोरा, नाक सरळ, केस काळे, अंगाने मध्यम, चेहरा उभट असून सोबत मोबाईल फोन आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधावा.

### प्लास्टर ऑफ पॅरिसची बंदी उठल्याचा फटका | पर्यावरण रक्षणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

# कागदी लगद्याच्या गणेशमूर्तींच्या मागणीत घट

| उरण | वार्ताहर |

**प्लास्टर ऑफ पॅरिस या पर्यावरणाला घातक असलेल्या मूर्तींना पर्याय म्हणून कागदाच्या लगद्यापासून बनविण्यात आलेल्या मूर्तींना मागणी वाढली होती. मात्र पुन्हा एकदा प्लास्टरच्या मूर्तींना परवानगी दिल्याने जवळपास ७० टक्के मूर्तींची मागणी घटली आहे. यात वर्षोनी वर्षे प्लास्टरच्या मूर्तींचा वापर करणाऱ्या गणेशोत्सव मंडळाकडून ही मागणी होती, अशी माहिती ज्येष्ठ मूर्तिकार मोरेश्वर पवार यांनी दिली आहे.**

सरकार आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा व्हावा याकरिता दरवर्षी प्रयत्न केले जात आहेत. यासाठी जाहिराती आणि विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. मात्र पर्यावरणावर परिणाम करणाऱ्या प्लास्टरला पर्याय असलेल्या पारंपरिक शाडूच्या मूर्ती आणि नवी पर्याय असलेल्या कागदाच्या लगद्याच्या मूर्तींना प्रोत्साहन देण्यासाठी या शासकीय हवे तसे लक्ष दिले जात नाही.

न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर मुंबई तसेच नवी मुंबईतील अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ तसेच खाजगी घरगुती गणेशभक्तांनी लगद्याच्या मूर्तींना पसंती दिली होती. कागदाच्या लगद्याच्या मूर्ती तयार करण्यासाठी माती आणि प्लास्टर पेक्षा अधिक वेळ लागतो. त्याचप्रमाणे मागणी कमी असल्याने या मूर्तींच्या किमती या दोन्हीच्या मूर्ती पेक्षा अधिक दर आकारला जात आहे. त्यामुळे ही मागणीही कमी आहे. मात्र पर्यावरण रक्षणाची जनजागृती करण्यात आली आहे. त्याचा चांगला परिणाम झाला आहे.

गणेशभक्तांकडून याची अंमलबजावणी म्हणून महाग असतानाही शाडूच्या मूर्तींनाही



मागणी वाढली होती. तर दुसरीकडे वजनाने हलक्या आणि पूर्णपणे पर्यावरण पूरक म्हणून गणल्या गेलेल्या कागदाच्या लगद्याच्या मूर्तींनाही माणी वाढली आहे.

जासई येथील प्रसिद्ध मूर्तिकार व जे जे स्कुलचे प्राध्यापक मोरेश्वर पवार हे गेल्या अनेक वर्षांपासून कागदाच्या लगद्याच्या गणेशमूर्ती तयार करीत आहेत. त्यांच्याकडे १ फुटा पासून ते दहा फुटा पर्यंतच्या मूर्ती तयार केल्या जात आहेत. यावर्षी आशा प्रकारच्या गणेशमूर्तींना चांगली मागणी आली होती. मात्र या अचानकपणे प्लास्टरच्या बंदीचा निर्णय मागे घेतल्याने जवळपास ७० टक्के मागणी कमी झाल्याची माहिती त्यांनी दिली आहे. कागद आणि गम यांचा वापर व पाण्यात विरघळून जाणारे रंग यामुळे या मूर्तींचे पाण्यात पूर्णपणे विघटन होऊन पर्यावरणाचे ही रक्षण होत असल्याचा दावा मूर्तिकारांकडून केला जात आहे.

## वडघर येथे विनामूल्य महाआरोग्य शिबीर

| माणगाव | प्रतिनिधी |

ग्रामीण भागात आरोग्य विषयक जनजागृती व्हावी व ग्रामीण भागातील विद्यार्थी व नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या दूर व्हाव्यात आजाराचे वेळीच निदान व्हावे याकरिता श्री प्रतिष्ठानच्या वतीने सोमवारी (दि. २१) सरस्वती विद्यामंदिर वडघर मुद्रे येथे दुपारी दोन ते सायंकाळी पाच वाजता विनामूल्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या आरोग्य शिबिरात मोफत तपासणी केली जाणार असून औषधोपचार देण्यात येणार आहेत. तसेच तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे.

या मोफत आरोग्य शिबिरासाठी उपजिल्हा रुग्णालय माणगाव यांचे विशेष सहकार्य लाभले असून पंचक्रोशीतील नागरिक व विद्यार्थ्यांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन श्री प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे. या महाआरोग्य शिबिरासाठी माणगाव तालुक्यातील अनेक मान्यवर, श्री प्रतिष्ठानचे पदाधिकारी, सरस्वती विद्यामंदिर वडघर विद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालकवृंद तसेच सरस्वती विद्यालयाचे आजी-माजी विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)

# विषारी राजकारणाची फळे

गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड या दोन आमदारांच्या कार्यकर्त्यांनी आपल्याला लोकशाहीतला पुढचा टप्पा गाठून दिला आहे. इतके दिवस दोन पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये रस्त्यावरची हाणामारी होणे हे नेहमीचे होते. आता विधिमंडळाच्या इमारतीतही हे प्रकार घडू लागले आहेत. एरवी रस्त्यावर शिव्या देणारे लोक देवळामध्ये भाविकपणे हात जोडतात. किमान देवळात असेपर्यंत तरी तिथले नियम पाळतात. पण त्यामुळे देवळातच हाणामारी आणि शिवीगाळ सुरु होते तेव्हा नाही म्हटले तरी धक्का बसतोच. तसाच धक्का अनेकांना बसला आहे. बुधवारी पडळकर व आव्हाड यांच्यात अत्यंत किरकोळ कारणावरून वाद झाला. आव्हाडांच्या म्हणण्यानुसार ते विधिमंडळाबाहेर बोलत उभे असताना पडळकर यांनी गाडीचा दरवाजा उघडा ठेवून त्यांना धक्का दिला. तर पडळकरांच्या गटाच्या म्हणण्यानुसार मंगळसूत्र चोर असे कोणीतरी त्यांच्याकडे पाहून ओरडल्याने कार्यकर्ते चिडले. आता यातले काहीही किंवा दोन्हीही घडले असेल तर हे शाळकरी पातळीवरचे आहे. ज्या मंडळींना लाखो लोक आपले प्रश्न मांडण्यासाठी, कायदे करण्यासाठी, सरकारच्या धोरणांवर चर्चा करण्यासाठी निवडून देतात त्यांचे हे वागणे पाहून कोणाचीही मान शरमेने खाली जाईल. पण आमदार व त्यांच्या कार्यकर्त्यांना याबद्दल काही लाज वाटते आहे का हा खरा प्रश्न आहे. यात पडळकर वा आव्हाड यापैकी कोण दोषी याचा निवाडा करणे अशक्य आहे व ते निरर्थकही आहे. राजकारण या पातळीला घेऊन येण्यास सर्वच पक्ष व त्यांचे नेते जबाबदार आहेत. खुद्द विधिमंडळ सभागृहात शिव्या किंवा वाईट भाषेचा वापर होणे हे अपवादात्मक राहिलेले नाही. ते सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकले जाते किंवा पत्रकार त्यावर लिहित वा बोलत नाहीत इतकेच. विधिमंडळ हे चर्चेचे व युक्तिवादांचे व्यासपीठ आहे. रस्त्यावर दोन जमाव जमले व भांडू लागले तर त्यांच्यात हाणामारीने निकाल लागतो. पण हा रानटी प्रकार झाला. आता आपण त्याहून कितीतरी पुढे आलो आहोत. ज्याची ताकद जास्त त्याचे म्हणणे बरोबर हे सूत्र अन्याय्य व अनैतिक आहे हे कळले म्हणून तर आपण लोकशाही पध्दत स्वीकारली.

## भाजपने पोसलेली गुंडगिरी

मात्र ही पध्दत स्वीकारताना आपण खास भारतीय रीतीने वागलो. एकीकडे चराचरात परमेश्वर आहे असे म्हणायचे आणि दुसरीकडे माणसाला माणूस म्हणून वागवायचे, अस्पृश्यता पाळायची ही दांभिकता आपल्या जुन्या काळच्या संस्कृतीचा भाग होतीच. ती आपण लोकशाहीमध्येही आणली. विधिमंडळात सन्माननीय सदस्य वगैरे उल्लेख करायचे आणि बाहेर कार्यकर्त्यांनी एकमेकांना आईबहिणीवरून शिव्या द्यायच्या किंवा दुसऱ्या पक्षाच्या लोकांवर सर्रास गुंडगिरी करायची हे आपण इतकी वर्षे चालू दिले. तरीही सार्वजनिक जीवनात किमान काही सभ्यपणा पाळला जावा असा दबाव आपल्यावर होता. भाजप सत्तेत आल्यापासून हे सगळे संकेत मोडून टाकण्यात आले आहेत. संस्कृतीच्या व संस्कारांच्या बाता मारणाऱ्या या पक्षानेच सर्वाधिक भ्रष्ट व गुंड लोकांना हाताशी धरले आहे. त्यांच्या वाटेल त्या बोलण्याला संरक्षण दिले आहे. नितेश राणे हे त्याचे महाराष्ट्रातले तर निशिकांत दुबे हे दिल्लीतले उदाहरण आहे. नितेश राणे उद्धव ठाकरे यांचा उल्लेख एकेरी तर करतातच, शिवाय त्यांना व इतर नेत्यांना अत्यंत वाईट विशेषणे लावतात. शिवसेना हा पूर्वापार हाणामाऱ्या करणारा पक्ष अशी त्याची प्रतिमा होती. तरीही पूर्वीचे शिवसेना नेते किमान सार्वजनिक ठिकाणी बोलताना काही बंधने पाळत होते. पण आता भाजपमध्ये गेलेल्या व मूळच्या भाजपच्या असलेल्या अनेक लोकांनी असले कोणतेच निर्बंध पाळायचे नाहीत असे ठरवले आहे. पडळकर किंवा गुणरत्न सदावर्ते हे लोक शरद पवार यांच्यासारख्या नेत्यांबद्दल सतत अत्यंत अवमानकारक रीतीने बोलत असतात. एरवी सभ्यतेचा आव आणून जगाला शहाणपणा शिकवणारे आपले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याबद्दल त्यांना कधी ताकीद दिलेली नाही. उलट आडून आडून ते त्यांचे कौतुकच करीत असतात. नितेश राणे यांची ही बोलण्याची शैली आहे असे ते मागे म्हणाले होते. शिवीगाळ व मारुन टाकण्याच्या धमक्या हे फौजदारी कायद्यानुसार गुन्हे होतात. ती कोणाची बोलण्याची शैली असू शकत नाही हे कायदा विषय शिकलेल्या फडणवीसांना ठाऊक नाही असे नव्हे. पण असली गुंडगिरी चालू ठेवूनच आपले राजकारण पुढे रेटता येऊ शकेल हे त्यांना ठाऊक आहे.

## विरोधक म्हणजे शत्रू

मध्यंतरी नाना पटोले हे अध्यक्षांच्या दिशेने धावून गेले म्हणून त्यांना तात्काळ एका दिवसासाठी निलंबित करण्यात आले. पण बाहेर वा सभागृहात वाह्यातपणा वा टगेगिरी करणाऱ्या सदस्यांना एरवी काहीच शिक्षा होत नाही. कालच भास्कर जाधव यांनी उपस्थित केलेल्या एका मुद्द्यावरून सत्ताधारी भाजपच्याच आमदारांनी अध्यक्षांपुढच्या जागेत धाव घेतली होती. असे कित्येक प्रसंग घडत असतात. पण अध्यक्षांचा अधिकार या नावाखाली त्याकडे दुर्लक्ष केले जाते व क्वचित किरकोळ कारवाई केली जाते. दरम्यान, विधिमंडळ इमारतीत पोलिस वगैरेंच्या उपस्थितीत कालच्या मारामारीचा प्रकार घडला म्हणून त्याची इतकी तरी चर्चा झाली. एरवी ग्रामपंचायती, जिल्हा परिषदांमध्ये आणि रोजच्या रोज रस्त्यांवर याच रीतीची गुंडगिरी सर्रास चालू असते. त्यावर जरब बसवणे हे फडणवीसांच्या पोलिसांचे काम आहे. पण तिथेही पक्ष पाहून कारवाई करायची की नाही व कोणावर कोणती कलमे लावायची हे ठरवले जाते. राज्यातला विरोधी पक्ष सध्या अत्यंत कमकुवत आहे. मात्र तरीही त्याचा जो काय थोडाफार विरोध असेल तोही सत्ताधाऱ्यांना सहन होईनासा झाला आहे. शरद पवार, उध्दव ठाकरे, राहुल गांधी यांच्याबाबत अत्यंत बेलगाम वक्तव्ये जाणीवपूर्वक केली जातात. दोन बाजूंमधील द्वेष अधिकाधिक वाढावा अशाच रीतीने काम केले जाते. ही भाजपच्या राजकारणाची देण आहे. यापूर्वी निवडणुका संपल्यानंतर काँग्रेस व विरोधी पक्षांमध्ये या रीतीचा वैरभाव शिल्लक राहत नसे. काल ज्या खेळीमेळीचा उल्लेख उद्धव यांनी केला ती दिसत असे. पण आता भाजपवाले हे विरोधी पक्षांना पाकिस्तानसारखे शत्रूच मानतात. त्यांना नष्ट करायला हवे अशीच शिकवण त्यांच्या कार्यकर्त्यांना बहुदा दिली जाते. सोशल मिडियामधून विरोधी नेत्यांबद्दल गलिच्छ भाषेत शिव्या देणे, महिला कार्यकर्त्या असतील तर त्यांना बलात्काराच्या जाहीर धमक्या देणे हे प्रकार भाजपच्या मोदी युगात सुरू झाले. विशेष म्हणजे भाजपचे मोदींसकट अनेक वरिष्ठ नेते अशा धमक्या देणाऱ्यांना सोशल मिडियावर फॉलो करतात अशाही बातम्या पूर्वी प्रसिध्द झाल्या आहेत. गुरुवारी विधिमंडळात जे झाले त्याला सर्वच पक्ष जबाबदार आहेत. पण भाजपने जी विषारी राजकीय संस्कृती आपल्याकडे आणली आहे त्याची ही फळे आहेत हे सर्वात जास्त खरे आहे.

विचार

# नवख्या संघाचा विक्रमी विजय

***ब्रिटनच्या धरतीवर एजबॅस्टनच्या मैदानावर इंग्लंड संघावर तब्बल ५८ वर्षांनी आणि विक्रमी ३३६ धावांनी भारताच्या रूपाने एका आशियाई देशाच्या संघाने विजय मिळवला. या विजयाने संघाचा आत्मविश्वास तर वाढवलाच, पण एक नवी दिशाही दिली. संघातल्या नवख्या खेळाडूंनी शुभमन गिलच्या नेतृत्वात साकारलेल्या या कौतुकास्पद विजयाने भारताच्या कसोटी क्रिकेटमधल्या आशा पल्लवीत केल्या आहेत. त्या निमित्ताने.***

**श्रीकृष्ण जोशी**



भारत आणि इंग्लंड यांच्यात खेळल्या जात असलेल्या अँडरसन - तेंडुलकर ट्रॉफीच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारतीय संघाने तब्बल ५८ वर्षांनी एजबॅस्टनच्या मैदानावर पहिल्यांदाच इंग्लंड संघावर विजय मिळवला. कर्णधार शुभमन बर्मिंगहॅममध्ये कसोटी जिंकणारा भारताचा एकमेव कर्णधार ठरला. दोन्ही डावांमध्ये कर्णधारपदाला शोभेल असा खेळ करून तो सामनावीर ठरला. पहिल्या डावात द्विशतकी तर दुसऱ्या डावात शतकी खेळी करणाऱ्या शुभमन गिलने एक आघाडीचा निडर फलंदाज आणि संयमी कर्णधार म्हणून त्याच्या चाहत्यांनी आणि भारतीय क्रिकेट रसिकांनी केलेली अपेक्षा अखेर खरी करून दाखवली. आकाशदीपने सामन्यात एकूण १८७ धावा देत पहिल्या डावात चार आणि दुसऱ्या डावात सहा बळी घेतले. तो बर्मिंगहॅममध्ये सर्वोत्तम गोलंदाजी करणारा भारतीय गोलंदाज ठरला. त्याच्या आधी १९८६ मध्ये चेतन शर्माने १८८ धावा देऊन १० बळी घेतले होते. बर्मिंगहॅममध्ये भारतीय गोलंदाजाने केलेल्या सर्वोत्तम गोलंदाजीचा हा विक्रम होता.

नवखे खेळाडू असलेल्या भारतीय संघाची इंग्लंडसारख्या मातब्बर संघाविरुद्ध खेळताना खरी कसोटी लागणार हे चित्र भारताने गमावलेल्या पहिल्या कसोटीतच स्पष्ट झाले होते. परंतु भारतीय खेळाडूंवरील पहिला सामना गमावल्याचे दडपण दुसऱ्या सामन्यादरम्यान कुठेही जाणवले नाही. पहिल्या डावात ५८७ धावांचा डोंगर उभारणाऱ्या आणि पहिल्या दिवसापासून सामन्यावर वर्चस्व गाजवणाऱ्या भारतीय संघाने इंग्लंडला संपूर्ण पाच दिवसांच्या खेळामध्ये कधीही डोके वर काढू दिले नाही. एक वेळ फॉलोऑनच्या स्थितीत असताना हॅरी ब्रुक आणि जेमी स्मिथ यांच्या त्रिशतकी भागीदारीने इंग्लंड संघाला वाचवले. ती जोडी भारताला लवकर फोडता आली नाही. स्मिथने १४४ चेंडूंमध्ये झंझावाती दीडशतक पूर्ण केले तर ब्रुकचे द्विशतक थोडक्यात हुकले. मोहंमद सिराजने पहिल्या डावात सहा बळी मिळवले, तर आकाशदीपने मोलाची साथ देत उर्वरित चार बळी मिळवले. या कसोटीमध्ये ३३६ धावांनी झालेला हा इंग्लंडचा सर्वात मोठा दुसरा पराभव ठरला. यापूर्वी २०२४ मध्ये इंग्लंडला भारताने राजकोटच्या मैदानावर ४३४ धावांनी मात दिली होती.

शुभमन बर्मिंगहॅममध्ये कसोटी जिंकणारा आणि दोन्ही डावात कर्णधारपदाला शोभेल असा खेळ करणारा सामनावीर ठरला. भारताच्या कसोटी संघाला कर्णधार म्हणून लाभलेल्या शुभमन गिल या गुणी आणि संयमी खेळाडूकडून एक आघाडीचा निडर फलंदाज आणि संयमी कर्णधार म्हणून खेळी केल्याचे पहायला मिळाले. चाहते आणि भारतीय क्रिकेट रसिकांकडून असलेली अपेक्षा त्याने अखेर खरी करून दाखवली. नवखे खेळाडू असलेल्या भारतीय संघावर पहिला सामना गमावल्याचे दडपण संपूर्ण सामन्यादरम्यान कुठेही जाणवले नाही, हे दुसऱ्या कसोटीचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. एक वेळ फॉलोऑनच्या स्थितीत असताना हॅरी ब्रुक आणि जेमी स्मिथ यांच्या त्रिशतकी भागीदारीने इंग्लंड संघाला वाचवले. पण ५८७ धावांचा डोंगर पार करणे घरच्या मैदानावर खेळणाऱ्या इंग्लंडला अथक प्रयत्न करूनही जमले नाही, आणि भारताला १८० धावांची आघाडी देत त्यांचा पहिला डाव ४०७ धावांवर आटोपला. पहिल्या डावात भारताच्या क्षेत्ररक्षकांनी महत्वाचे झेल सोडले नसते तर इंग्लंडला फॉलोऑन देऊन जास्त दबावाखाली खेळवता आले असते.

भारतीय कसोटी क्रिकेट संघास आज वीस-वीस षटकांच्या आंतरराष्ट्रीय सामन्यांमधून आणि आयपीएलसारख्या स्पर्धांमधून नावारूपाला आलेले गुणी आणि मेहनती खेळाडू लाभले आहेत. कर्णधार शुभमन गिलने तर कसोटी, एकदिवसीय आणि टी ट्वेंटी अशा तीनही प्रकारांमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे.

सातत्यपूर्ण कामगिरी करणारा हा पंजाबचा २५ वर्षीय जीगरबाज खेळाडू इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या मालिकेत भारताचा ३५ वा कसोटी कर्णधार म्हणून खेळत आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीनंतर कर्णधार शुभमन गिलच्या रुपाने भारतीय कसोटी क्रिकेटच्या नव्या अध्यायाला सुरुवात झाली आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या अनुपस्थितीत मोहंमद शमी कसोटी संघात नसणे हा भारतीय संघासाठी मोठा झटका होता. कसोटीमध्ये नव्याने कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारणाऱ्या शुभमनच्या नेतृत्वात भारतीय संघाने इंग्लंड संघावर त्यांच्या घरच्या मैदानावर आणि ज्येष्ठ खेळाडूंशिवाय विजय मिळवला हे कौतुकास्पद आहे. इंग्लंडच्या आव्हानाला शुभमनच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ कसा सामोरा जातो, याकडे संपूर्ण क्रिकेटविश्वाचे लक्ष लागले होते असे म्हटले तर वावगे ठरू नये. शुभमन स्वतः सध्याच्या घडीला भन्नाट फॉर्मात आहे, त्याने सातत्यपूर्ण कामगिरीचे प्रदर्शन केले आहे. कोहली भारताचा सर्वात यशस्वी कसोटी कर्णधार आहे. त्याने ५८.८२ सरासरीने ६८ पैकी ४० कसोटी सामने जिंकले आहेत. शुभमनकडून भारतीय क्रिकेटरसिकांना अशाच प्रकारच्या कामगिरीची अपेक्षा असेल. कर्णधार शुभमन गिल हा पंजाबचा हा गुणी आणि सातत्यपूर्ण कामगिरी करणारा २५ वर्षीय खेळाडू इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या मालिकेत भारताचा ३५ वा कसोटी कर्णधार म्हणून खेळत आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीनंतर आता शुभमन गिलच्या कर्णधारपदाने भारतीय कसोटी क्रिकेटच्या नव्या अध्यायाला सुरुवात झाली आहे. एक आघाडीचा निडर फलंदाज आणि संयमी कर्णधार म्हणून भारतीय क्रिकेट रसिकांनी केलेली अपेक्षा अखेर त्याने खरी करून दाखवली. पहिल्या डावात द्विशतकी तर दुसऱ्या डावात शतकी खेळी करून त्याने आपण एक धुरंदर फलंदाज असल्याचे सिद्ध केले. शुभमनच्या फलंदाजीत दिसणारी एकाग्रता आणि संयमाला इंग्लंडमध्ये बरीच प्रशंसा मिळाली. रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या अनुपस्थितीत, कसोटी क्रिकेटमध्ये कर्णधारपदाची जबाबदारी पार पाडण्याचा मोठा अनुभव नसतानाही शुभमनच्या नेतृत्वात भारतीय संघाने इंग्लंडच्या संघावर त्यांच्या घरच्या मैदानावर विजय मिळवला हे कौतुकास्पद आहे. ज्येष्ठ खेळाडूंशिवाय इंग्लंडच्या आव्हानाला शुभमनच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ कसा सामोरा जातो याकडे संपूर्ण क्रिकेटविश्वाचे लक्ष लागले असल्याने हा विजय मोलाचा ठरला. शुभमन गिलने डिसेंबर २०२० मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. तो स्वतः सध्याच्या घडीला भन्नाट फॉर्मात आहे, त्याने सातत्यपूर्ण कामगिरीचे प्रदर्शन केले आहे. विराट कोहलीचा जुना विक्रम मोडत शुभमन गिलने कर्णधार म्हणून विक्रम करताना २५ वर्षांपेक्षा कमी वयात पाच कसोटी शतके झळकावली आहेत. तो सध्याच्या घडीला भन्नाट फॉर्मात आहे. शुभमनच्या नेतृत्वात भारतीय संघाने मिळवलेल्या पहिल्या कसोटीमुळे कर्णधार म्हणून त्याच्याकडून भारतीय क्रिकेट रसिकांना अशाच प्रकारच्या कामगिरीची अपेक्षा असेल. कर्णधारपदाचे दडपण न घेता दोन्ही डावांमध्ये त्याने केलेल्या यशस्वी खेळी कौतुकास्पद आहेत. त्याच्या या निडर खेळीचा पुढे जाऊन भारताला नक्की फायदा होईल. आपल्या नेतृत्वात पहिली कसोटी जिंकल्यावर शुभमनने मनोगत व्यक्त करताना मी खेळाडूंना पहिल्या कसोटीतील पराभवाचा कोणताही दबाव न बाळगता शांत आणि स्थिर राहून उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन घडवण्याचा सल्ला दिला होता, असे सांगितले. पराभवाचा दबाव खेळाडूच्या कामगिरीवर नकारात्मक परिणाम करतो, असे तो सांगतो. कर्णधार नसतानाही संघातील सदस्यांशी त्याने चांगले संबंध निर्माण केले आहेत. ते त्याला भविष्यकाळात खेळाडूंमध्ये संघिक वृत्ती निर्माण करण्यास आणि कायम राखण्यास मदत करू शकतील. या वृत्तीमध्येच एका कर्णधाराचे आणि त्याच्या संघाचे यश दडलेले असते असे म्हणता येईल.

चर्चा आजची

# लोकशाहीच्या मंदिरात अब्रूचे धिंडवडे

**राकेश लोहार**



महाराष्ट्राची राजकीय संस्कृती किती विकृत होत चालली आहे, याचे भडक उदाहरण संपूर्ण जागनं गुरुवारी पाहिले. सतत बिहारच्या नावाने खडे फोडणारे नेते आणि कार्यकर्तंनी लाज आणणारी घटना विधानभवनात घडली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामरी झाली. लोकशाहीचे मंदिर समजल्या जाणाऱ्या विधिमंडळात घडलेल्या घटनेने महाराष्ट्राच्या सुसंस्कृत राजकारणच्या परंपरेला काळीमा फासला आहे.

मागील काही वर्षांत महाराष्ट्राचे राजकारण किती असंस्कृत झाले आहे, याचे दर्शन पावलोपावली होताना दिसत आहे. नेत्यांकडूनही कबुली दिली जाते. त्यासाठी यशवंतराव चव्हाण, शरद पवार, अटलबिहारी वाजपेयी, बाळासाहेब ठाकरे आदी नेत्यांची नावे घेत त्यांच्या काळातील राजकीय परंपरेची अनेकजण आठवण काढून आताच्या राजकारणातील दोषही दिला जातो. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप, आंदोलने तर तेव्हाही होतच होती. पण, त्यांची भाषा, या नेत्यांच्या कार्यकर्त्यांमधील दिलदारपणा, विधिमंडळातील भाषणांना मिळणारी दाद हे राजकीय विरोधकांमधील मनांची श्रीमंती दाखविणारी होती. परंतु, आजही राजकारणाची परिस्थिती पार बदलून गेली आहे. रस्त्यावरची भांडणे आज विधिमंडळात गेल्याने राजकारणाची दशा झाल्याचे खेदाने म्हणावेसे वाटते. विधिमंडळ परिसराला जणू कुस्तीचा आखाडा करुन टाकला की काय, असे शोभा करणारे वर्तन आज कार्यकर्त्यांकडून घडते, याची लाज लोकप्रतिनिधींना वाटायला हवी. सत्तेचा माज, मुजोरपणाने कळस गाठल्यावर त्याचे परिणाम काय असतात, हेच चित्र उभ्या महाराष्ट्राने पाहिले. या प्रकारची मात्र संपूर्ण जगभरात छी-तू झालीय, त्यामुळे महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेलीय. विधिमंडळाची परंपरा जपण्याचे उत्तरदायित्त्व हे आमदारांचे आहे. आमदारांचे वर्तन हे विधिमंडळाची प्रतिमा उंचावणारे असावे. अशा पवित्र ठिकाणी सर्वांनीच काही नियम पाळणे गरजेचे आहे, हे सांगण्याची वेळ आज अध्यक्षांवर आलेय, यापेक्षा दुर्दैवी गोष्ट कोणती असू शकत नाही. लाखो-करोडो लोकांचे प्रतिनिधी म्हणून आपण ज्या लोकांना निवडून देतो, त्यांचे प्रताप पाहून सर्वसामान्य जनता आता नक्कीच धन्य झाली असेल, यात वादच नाही. नेतेच मारामारीची, शिवीगाळीची भाषा भर सभागृहात करीत असतील, तर त्यांच्या कार्यकर्त्यांकडून चांगल्या वर्तनाची अपेक्षा कोणी ठेवायची? गुंडगिरी पोसणाऱ्या नेत्यांमुळे 'कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा' असे शरमेने म्हणण्याची वेळ आलेय. आतातरी सुज्ञ जनतेने जागे होण्याची गरज आहे. कारण, निवडणुकांचे घोडा मैदान काही दूर नाही. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती अशाच गुंडपुंड लोकांचे बगलबच्चे पुढारी म्हणून पुढे येतील. मतांसाठी भीक मागतील. तुम्हीच आमचे तारणहार, मतदारराजा अशा काहीबाही उपमा देऊन जनतेला खुश करण्याचे काम करतील. परंतु, आता जनतेने 'पुढच्यास ठेच, मागचा सावध..' याप्रमाणे एकदा केलेली चूक पुन्हा करु नये, एवढीच कळकळीची विनंती असेल. म्हणजे, अशा गुंड प्रवृत्तीच्या लोकांना निवडून दिल्याने जी अवस्था आज विधिमंडळाची झालेय, तीच अवस्था स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये होण्यास वेळ लागणार नाही. त्यासाठी सुसंस्कृत, गावाचे, शहराचे, मतदारराजाचे भले जाणणारा पुढारी-नेता, उमेदवार निवडून देण्याचे काम आपल्याला इथून पुढे करायचे आहे. आपल्याला चांगला महाराष्ट्र घडवायचा असेल, तर त्यासाठी आपल्यालाच काहीतरी केले पाहिजे. आणि, काहीतरी म्हणजे नेमके काय करायचे असेल, तर ते योग्य उमेदवारावाला मतदान करुन निवडून आणणे. आपल्यापासून चांगल्या कामाची सुरुवात केल्यास एकना एक दिवस रसातळाला गेलेली, लाज निघालेली राजकीय परिस्थिती नक्कीच बदलेल, यावर विश्वास आहे. आपल्याला लोकशाही वाचवायची असेल, तर एवढे तर आपण नक्कीच करु शकतो.

लोकसंसद

## इंदूरचे कौतुक आणि अभिनंदन!

देशातील ४५०० हून अधिक शहरांमधील १४ कोटी लोकांनी समोरासमोर संवाद करून, स्वच्छता ॲप, मायगव्ह ॲप आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म अशा विविध माध्यमातून पार पाडलेल्या केंद्र सरकारच्या वार्षिक स्वच्छता सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये 'सुपर स्वच्छ लीग' पुरस्कार श्रेणी अंतर्गत इंदूरने सलग आठव्यांदा देशातील सर्वात स्वच्छ शहराचा मान मिळवला आहे. परंतु इंदूर शहराला २०१७ पासून सलग आठव्यांदा हे अव्वल स्थान सहजासहजी प्राप्त झालेले नाही. त्यासाठी इंदूर महानगरपालिकेने व तेथील नागरिकांनी दरवर्षीप्रमाणे शहर स्वच्छ ठेवण्यासाठी अतोनात कष्ट घेतले. घरोघर जाऊन कचऱ्याचे १०० टक्के वर्गीकरण करून वेगळा घनकचरा गोळा केला. मलनिस्सारण प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित केले. शहरात 'रिड्यूस, रियूज आणि रिसायकल' असे तीन आर संबंधित मॉडेल लागू केले आहे. टाकाऊ वस्तूंपासून कलाकृती बनवण्यात येतात. त्यानुसार उद्यानांची निर्मिती करण्यात आली आहे. शाळांमध्ये, कार्यालयांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेबाबत जनजागृती मोहीमा राबवल्या गेल्या. 'एआय'सह आधुनिक तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर, प्रशासनाची पारदर्शक कार्यपद्धती, लोकसहभाग आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर स्वच्छतेच्या बाबतीत देशातील आपले अव्वल स्थान टिकवून धरणाऱ्या इंदूरचे कौतुक आणि अभिनंदन!

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## आता अधिवेशनाचा थेट तमाशा

आमदार जितेंद्र आव्हाड यांनी आमदार गोपीचंद पडळकर यांना उद्देशून ''मंगळसूत्र चोर'' म्हटलं. दुसऱ्या दिवशी पडळकरांचे समर्थक आव्हाड समर्थकांवर धावले. हाणामारी झाली. आधी एकमेकांवर सभागृहात शाब्दिक कुरघोडी आणि नंतर सभागृहाबाहेर हाणामारी. नंतर या घटनांचे वृत्तवाहिन्यांवर थेट प्रक्षेपण. एखादी दैनंदिन मालिकाही फिकी पडावी एवढी नाट्यमयता विधानभवनातील राडा प्रकरणात दिसून आली. विधानसभा म्हणजे चर्चा, प्रश्न, उत्तरं यासाठी असते. पण आता ती आखाडा झाली आहे. कधी वाटायचं, अधिवेशनाच्या वेळी जनतेच्या प्रश्नांवर चर्चा होईल. आता वाटतं, पुढचा एपिसोड कोणता आणि कोण कुणाला 'झोडणार'? सगळ्यात गंमत म्हणजे हे सगळं लोकांनी पाहिलं घरबसल्या. वृत्तवाहिन्यांनीही आपला जमेल तितका वेळ दिला. आता कुठल्या मालिकेची गरज आहे? इथे सगळं तयार आहे वादविवाद, मारहाण, टोमणे आणि शेवटी 'जनतेच्या' नावाने गोंधळ. **- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

दिनविशेष

# बहुविध प्रतिभेचे धनी डॉ. जयंत नारळीकर

जगप्रसिद्ध खगोल-भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण डॉ जयंत नारळीकर यांचे आज जयंती. डॉ. जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते, तर आई सुमती या संस्कृतविदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए, एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ. फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला.

१९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ. जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याचबरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ. जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञान कथेसारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञानासारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली.

खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रयचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजली. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. डॉ. जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले. हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ. जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला. याच वर्षी २० मे २०२५ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले.

# स्कूल व्हॅन चालकांसह मुख्याध्यापकांची बैठक



। पनवेल । प्रतिनिधी ।

दिवसेंदिवस पनवेल शहरात वाहतुकीची समस्या वाढतच आहे, त्यातच पार्किंग सुविधा नसल्याने अनेकठिकाणी रस्त्यांच्या दुतर्फा वाहने पार्किंग केली जात आहेत. अशातच शाळेच्या सुटण्याच्या आणि भरण्याच्या वेळी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्यामुळे यावर मार्ग काढण्यासाठी पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी हद्दीतील शाळेच्या मुख्याध्यापकांची तसेच स्कुल व्हॅनच्या मालकांची संयुक्तिक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये वाहतुकीपासून मुक्तता मिळविण्याच्या दृष्टीने काही मार्गदर्शक सूचना त्यांनी शाळांना दिल्या.

यावेळी संजय पाटील यांनी शाळेच्या गेटच्या दोन्ही बाजूस सीसीटीव्ही लावणे, स्कूल व्हॅन साठी ग्राउंड वर पार्किंग उपलब्ध करून देणे, स्कूल व्हॅनना कुठे जाता येतात त्याप्रमाणे नंबर देण्याची व लांबचे विद्यार्थी यांना लवकरात लवकर जाण्याची सुविधा करून देणे, शाळेच्या गेट व रस्त्यावर वॉचमन, शिक्षक किंवा शिक्षक ठेवणे, वाहनांची कागदपत्रे अद्ययावत असावीत, वाहन चालकाने बॅच लावावा, तो कुठून व कोणत्या विद्यार्थ्यांची वाहतूक करतो याबाबत शाळेने माहिती ठेवावी, शाळेची वेळ आपसात मिटिंग करून ठरवून घ्यावे जेणेकरून रस्त्यावर वाहतुकीसाठी अडथळा होणार नाही आदी विषयांबाबत या मिटिंगमध्ये संजय पाटील यांनी जनजागृती केली. या बैठकीमध्ये शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि २० ते २५ वाहन चालक-मालक उपस्थित राहिले होते.

## सृष्टी जाधवला गुणवत्ता पुरस्कार

**म्हसळा :** जिजामाता शिक्षण संस्था वरवठणे आगरवाडा मराठी माध्यमिक शाळेची इयत्ता दहावीची विद्यार्थिनी सृष्टी जाधव हिने उज्वल यश मिळवून शाळेत पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याने तीला महाराष्ट्र शासन सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण विभागा मार्फत देण्यात येणारे राजर्षी शाहू महाराज पुरस्कार प्राप्त झाला असल्याचे जाहीर केले आहे. सृष्टी जाधव हिने सदर पुरस्कार प्राप्त करून जिजामाता शिक्षण संस्थेचे, गावाचे आणि आई वडिलांचे नाव उज्वल केल्याने तिचे मान्यवरांनी कौतुक करून अभिनंदन केले आहे.

## बोध



आपल्या सभोवर असणारा हा पसारा हाच संसार. हा कधीच सोडायचा नसतो. हा कोणालाही सुटला नाही. द्विदल धान्य प्रमाणे हा आपणाशी सतत राहणारच आहे. आत्म साक्षात्कारी महान संतांना आणि भगवान कृष्णाला देखील हा संसार होताच. हे जाणूनच सर्व संतांनी संसार सोडू नका असे सांगितले. ज्ञानोत्तर स्थितीत जातो तो संसार आणि जाते ती भेद बुद्धी. जगाशी आपली जुनाट सोयरीक आहे हे कळते. तस्मात टाकायचा आहे तो प्रपंच आणि भेदबुद्धी. आत्मोपय बुद्धीचा उदय झाला म्हणजे विश्व हे आपले कुटुंबच होते.आणि सहजच विश्वकल्याण हेच आपले कर्तव्य होऊन राहते. हेच भगवान श्री ज्ञानदेवांचे सांगणे. हीच धारणा म्हणजे त्यांची सेवा आणि गुरु आज्ञा पालन. आपण हे निश्चिंतपणे जाणले पाहिजे.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१९ जुलै**

१)श्रीम.वसुधा प्रभाकर शेंबेकर, श्रीबाग-२,अलिबाग, १९-७-१९३६
२)श्री.प्रभाकर शिवराम गुरव वेश्वी,अलिबाग, १९-७-१९४९
३)श्री.मधुकर लक्ष्मण बेलोसकर चेंढरे, अलिबाग, १९-७-१९५७
४)श्री.अशोक रामचंद्र काठे मु.कामथ, अलिबाग १९-७-१९४८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०-८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**आशा प्रदिप पाटील, वाढदिवस, विद्यानगर अलिबाग**



**कायर कल्पेश वर्तक, ५ वा वाढदिवस, अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस हया नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे, ढवर, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक सौ.प्रविणा दयानंद गावडे व श्री.शिरीष श्रीकृष्ण मिरजकर यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./ हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| ढवर, ता.अलिबाग, जि.रायगड | ६२५ | जिरायत ०-३०-६० पो.ख.०-०२-३० एकूण क्षेत्र ०-३२-९० | ९-०६ |

अलिबाग,
दि. १८/०७/२०२५

सही/-
ॲड. महेश सुहास म्हात्रे
ADVOCATE
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor,
Flat No. 1.Ch. Shivaji Chouk.
Near Gawade Optics, Alibag Raigad

## रायगड जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतपेढी लि.अलिबाग

**रजि.न.के.बी.ए.बी.एन. के.१०४ स्थापना १८-०१-१९६३**
**६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदांसाठी )**

रायगड जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतपेढी लि., अलिबाग या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ०३/०८/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ''स्वर्गिय गोविंद बाबू नार्वेकर सभागृह'' भंडारी भवन, पतंग हॉटेलच्या बाजूला, अलिबाग रेवदंडा रोड, श्रीबाग-अलिबाग येथे चेअरमन मा.श्री.सुरेश वासुदेव जांभळे, यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी सदर सभेस उपस्थित रहावे हि विनंती.

**-: सभेपूढील कामे :-**

१. मागिल दि. १७/०८/२०२४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. सन २०२४-२०२५ या वर्षाचे नफा तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक वाचून मंजूर करणे.
३. सन २०२४-२०२५ या वर्षाच्या नफा वाटणीस मंजूरी देणे.
४. सन २०२५-२०२६ या वर्षाचे अंदापत्रकास मान्यता देणे.
५. सन २०२४- २०२५ चा वैधानिक लेखापरिक्षक यांचे अहवाल वाचणे.
६. सन २०२५-२०२६ सालासाठी वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.
७. सन २०२५-२०२६ सालासाठी अंतर्गत हिशोब तपासनीसाची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८. मा.चेअरमन यांचे परवानगीने आयत्या वेळीच्या विषयांचा विचार करणे.

**सुदिन सु. कांबळे** ऑ.सेक्रेटरी | **वैभव ज. पाटील** व्हा.चेअरमन | **सुरेश वा.जांभळे** चेअरमन

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १९/०७/२०२५

**सुचना :** १. गणपूर्ती अभावी सभा तहकूब करावी लागल्यास सदर वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल, त्या सभेस गणसंख्या पूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. सन्माननीय सभासदांनी सभेपुढे मांडावयाच्या लेखी सुचना, लेखी स्वरुपात वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी पाच दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात पाठवाव्यात.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री.सचिन हरिश्चंद्र भगत यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक श्री.विलास वासुदेव थोरवे यांचेकडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. उक्रुळ, ता.कर्जत, जि.रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ३३ | ७/अ | ०-२२-०० | ०-२८ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. १९/०७/२०२५.

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता-शॉप नं.१२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
मो.- ९३२५०६००३७.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.प्रमोद सुभाष पांगारे, रा. ब्राम्हण आळी, शिवगंगा, शंकर मंदिर जवळ, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड, ४१०१०१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड, येथील बिनशेती मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ४७१/३२ | २.२६.०० | २२.६० | श्री.श्याम कुमार श्रीनिवासन |

वरील वर्णनाच्या बिनशेती जमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ०७ (सात) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १९/०७/२०२५.

सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत,''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे.
मो.नं.७३८५००४८०६.

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे निगडी, तलाठी सजा वेश्वी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मौजे निगडे, भूमापन क्र. व उपविभाग क्र.३५/१/१/१, क्षेत्र ०-४२-०० हे.आर., आकार रु.७.३३ पैसे ही मिळकत माझी आई कै.लता शरद थळे (पूर्वाश्रमीची लता मधुकर बोले) हिचे आजोबा कै.लक्ष्मण बोले यांच्या मालकी व ताबेकब्जा वहिवाटीची होती. माझे आईचे आजोबा कै.लक्ष्मण बोले यांचे निधन झाल्यानंतर नमूद मिळकतीच्या सातबारा सदरी आजमितीस माझी आई कै.लता शरद थळे (पूर्वाश्रमीची लता मधुकर बोले) हिचे वडिल श्री.मधुकर लक्ष्मण बोले यांचे नांवे नोंदलेली आहे.

माझी आई कै.लता शरद थळे (पूर्वाश्रमीची लता मधुकर बोले) हिचे दि. १२/२/२०२२ रोजी निधन झालेले आहे. तिचे मृत्यूपश्चात मी तिचा कायदेशीर एकमेव वारस आहे. नमूद मिळकत ही वडिलोपार्जित मिळकत असल्यामुळे नमूद मिळकतीमध्ये माझ्या आईच्या मृत्यूपश्चात असणारा कायदेशीर हिश्श्याचा मी कायदेशीर मालक आहे. अशी वस्तुस्थिती असताना नमूद मिळकत माझे आजोबा मधुकर लक्ष्मण बोले हे परस्पर त्रयस्थ व्यक्तीस सदरची मिळकत विक्री करीत असल्याची खात्रीशीर माहिती मिळालेली आहे. नमूद मिळकतीमध्ये माझी आई कै.लता शरद थळे (पूर्वाश्रमीची लता मधुकर बोले) हिच्या मृत्यूपश्चात माझा कायदेशीर हिस्सा आहे. नमूद मिळकत विक्रीस माझी कडक हरकत आहे. तरी वर नमूद मिळकतीसंदर्भात कोणताही खरेदी-विक्रीचा व्यवहार माझे अपरोक्ष मधुकर लक्ष्मण बोले, रा.वाडगाव, ता.अलिबाग, जि.रायगड यांचेशी करु नये. जर तसा व्यवहार माझ्या अपरोक्ष हरकत असताना केल्यास तो व्यवहार माझेवर बंधनकारक राहणार नाही व मी त्याच्या विरुद्ध दिवाणी व फौजदारी स्वरुपाची कारवाई करीन हे तमाम जनतेस कळावे.

दिनांक : १८/०७/२०२५

सही / -
**श्री.सुरज शरद थळे**
रा.वाडगाव, पो.वेश्वी,
ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.नं. ९५२७०६१३६०, ७७७५९७१४०७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेल्या मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्रीम.भावना भास्कर महाडिक, २) श्री.शैलेश भास्कर महाडिक, ३)श्री.निलेश भास्कर महाडिक, १ ते ३ रा. रायशेत, रामराज, ता.अलिबाग, जि.रायगड ४) सौ. दिपाली चंदन म्हात्रे रा.चौकीचा पाडा, हनुमान मंदिराजवळ, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या सोबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**तलाठी सजा रामराज व ग्रामपंचायत रामराज हद्दीत मौजे रायशेत (राजेवाडी) येथील शेतजमिन मिळकतीचे विस्तृत वर्णन खालीलप्रमाणे,**

| मौजे | भुमापन क्रमांक | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| राजेवाडी | ३९ | १-३७-८० | १७.२५ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकत निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक :-१८-०७-२०२५.

सही/-
**(ॲड.आर.आर.कुलसंगे)**
**ॲडव्होकेट**

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

**(भारत सरकारचा उपक्रम )**

**विज्ञापन सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या नाविन्यपूर्ण आणि ग्राहक-केंद्रित मालवाहतूक सेवा प्रदान करण्याच्या **सततच्या वचनबद्धतेनुसार, कोलाड (महाराष्ट्र) आणि वेरणा (गोवा) दरम्यान गाड्यांच्या वाहतुकीसाठी रो-रो सेवा सुरू करण्याची योजना आहे**. प्रत्येक गाडीसाठी शुल्क **रु.7,875/- (जीएसटीसह)** आहे. ही सेवा 23.08.2025 रोजी कोलाड येईल आणि 24.08.2025 रोजी वेरणा येथून सुरू होईल आणि 11.09.2025 पर्यंत प्रत्येक दिवसाआड चालवण्यात येईल. एका गाडीसाठी जास्तीत जास्त तीन व्यक्ती संलग्न ३ एसी कोच किंवा एसएलआर कोचमध्ये निश्चित भाड्याने प्रवास करू शकतात. बुकिंग 21.07.2025 रोजी सुरू होईल आणि 13.08.2025 रोजी बंद होईल. अधिक माहितीसाठी, **www.konkanrailway.com** ला भेट द्या:

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-साळोख तर्फे वरेडी ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकांचे नांव | स.नं./हि. नं. | क्षेत्र हे.आर.पा. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ओंकार गोवर्धन मुंब्रेकर | ८३/० | ०-५३-६ पैकी ०-२८-० पो.ख. ०-०५-६ | २.३५ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात(०७) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील बिनशेती मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता.कर्जत, जि.रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

प्रो. जमा                                   नि-७/ड
अर्जदाराचे अभिवक्ता - ॲड पंकज भगवान तरे

**जाहीर सूचना**

दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक ५६/२०२५

**पनवेल येथील मा. जिल्हा न्यायाधीश पनवेल रायगड यांचे न्यायालयात**

१) श्री.भुषण अनंत कार्ले
वय - ४३ वर्षे, व्यवसाय- शेती,
अर्जदार क्र १ स्वत: करीता व अर्जदार
क्र २ चे पालनकर्ता वडील म्हणून                    अर्जदार
२) कु.निशांत भुषण कार्ले
वय :- १५ वर्षे, व्यवसाय-शिक्षण,
रा.दोघेही रा.नविन पोसरी, मोहोपाडा,
ता.खालापूर, जि.रायगड ४१०२२२

सर्व लोकांस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की :-

सदरील अर्जदार यांस कु.निशांत भुषण कार्ले, वय-१५ वर्षे, असा मुलगा आहे. अर्जदार आणि कु.निशांत भूषण कार्ले, व अर्जदार यांचा मोठा मुलगा मंदार भुषण कार्ले, यांचे नावे खालील वर्णनाची अविभक्त सामाईक हिश्याची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौज-नडोदे, ता.खालापूर, जि.रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| ७ | १अ/१ | ०-५५-०० पो.ख ०-००-०० एकुण क्षेत्र.०-५५-०० | ३-०० |
| ७ | १अ/२ | ०-४०-९० पो.ख ०-००-०० एकुण क्षेत्र.०-४०-९० | २-४० |

(जिवा उल्लेख येथून पुढे पुनरुक्ती टाळण्याच्या उद्देशाने ''अर्ज मिळकत '' असा केलेला आहे.

वर वर्णन केलेली मिळकत कु.निशांत भूषण कार्ले याचे पालनपोषनाकरीता व पुढील माध्यमिक व महाविद्यालयीन आणि उच्च शिक्षणाकरीता आणि अर्जदार यांच्या आर्थिक अडचणीपोटी विक्री करणेची आहे. त्याप्रमाणे अर्जदार यांनी कु. निशांत भुषण कार्ले याच्या अर्ज मिळकतीमधील असलेल्या अविभक्त हिश्याची नैसर्गिक पालक म्हणून विक्री करणेकरीता परवानगी मिळणेसाठी या मा. न्यायालयामध्ये अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये केलेल्या मागणीप्रमाणे अर्जदार यांच्या हक्कास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास तसे त्यांनी लेखी पुराव्यासह या मा.न्यायालयात सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास हे मा.न्यायालय पुरावा घेऊन योग्य वाटल्यास अर्जदार यांस कु.निशांत भुषण कार्ले याचे नैसर्गिक पालक म्हणून अर्ज मिळकतीमधील कु.निशांत भुषण कार्ले हिचा अविभक्त हिस्सा विक्री करणेची परवानगी देईल. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
**क लिपीक**

शिक्का

सही/-
**सहा अधीक्षक,**
**जिल्हा न्यायालय, पनवेल.**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे धोकवडे, ता.अलिबाग जि.रायगड येथील १) गट नं.१०२, क्षेत्र १४-४०-०० आर.चौ.मीटर, आकार २८८.०० रू.पैसे, २) गट नं.१०३, क्षेत्र २६-८०-०० आर.चौ.मीटर, आकार ५३६.०० रू. पैसे, या बिनशेती मिळकती तसेच ग्रुप ग्रामपंचायत धोकवडे हद्दीतील, मौजे धोकवडे, १) मालमत्ता क्र.१२५२, क्षेत्र २३५२ चौ.मी. २) मालमत्ता क्र.१२५३, क्षेत्र १५६ चौ.मी. ३) मालमत्ता क्र.१२५४, क्षेत्र ४९ चौ.मी. ४) मालमत्ता क्र.१२५५, क्षेत्र ३६ चौ.मी. या घर मिळकती तसेच एक स्विमींग पुल सह (तद्नंतर सदर जाहीर नोटीसीत ''सदर मिळकती'' असा उल्लेख केलेला आहे.) या मिळकतीचे विद्यमान मालक मनिषा मिलींद कोरडे व मिलिंद अनंत कोरडे यांच्याकडुन आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १८/०७/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे-कोपर, ता.अलिबाग, जि.रायगड, येथील गट नंबर ८९/३, एकूण क्षेत्र ४-००-०० हे.आर., आकार ०.०० रू.पैसे पैकी क्षेत्र ३-६०-०० हे. आर. ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.गजानन रामा भगत रा.मु. तिनविरा, पो.कामार्ले, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १८/०७/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,
ए विंग, रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर,
ब्राम्हणआळी, अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पाल्हे, ता.अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक १) अनिता अरुण म्हात्रे, २) प्रसन्न अरुण म्हात्रे, ३) अमृता अरूण म्हात्रे, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| पाल्हे ता.अलिबाग | १९७ | जिरायत ०-२७-१० पो.ख. ०-०७-०० एकुण ०-३४-१० | ४.८१ |

सदर वर नमुद जमिन मिळकती पैकी विक्रेता यांचे नावे असलेले ०-०८-०० हे. आर, पो. ख. ०-०२-०० हे. आर. असे एकुण ०-१०-०० हे.आर. क्षेत्राची जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र जप्ती लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहीवाट रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १८/०७/२०२५
मोबा. ९९२२७९८५२८

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. चिंचपा गल्ली, नागाव
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की तलाठी सजा हमरापुर हद्दीतील मौजे हमरापुर , ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री.सुर्यकांत रामदास पाटील यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री.प्रसाद प्रकाश देशमुख यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट न./हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| हमरापुर | १६२/३/अ/१ | ०.३०.५० पो.ख ०.०६.०० एकुण क्षेत्र ०.३६.५० | ०.६९ |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५(पंधरा) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही /-
ठिकाण : पेण
दि.१९/०७/२०२५

**ॲड हेमा ज.पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो.नं.९८२२०३०३८९

## निवडक

### रसलची टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती

**नवी दिल्ली :** वेस्ट इंडीजचा स्फोटक अष्टपैलू खेळाडू आंद्रे रसलने आज आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. तो ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यानंतर निवृत्त होणार आहे. हा दुसरा सामना रसलच्या घरच्या मैदानावर खेळला जाणार असून त्याने आपल्या घरच्या प्रेक्षकांसमोरच अखेरचा सामना खेळण्याची इच्छा व्यक्त केली आहे.



अनेक अविस्मरणीय कामगिरी आणि सामना फिरवणाऱ्या खेळींसह वेस्ट इंडीजसाठी रसलने गेल्या दशकभरात टी-२० क्रिकेटमध्ये आपली वेगळी छाप उमटवली होती. रसलने २०१० मध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करत आतापर्यंत ७४. टी-२० सामने खेळला आहे. त्याने एक हजारपेक्षा अधिक धावा केल्या असून ६१ विकेट्सही टिपल्या आहेत. २०१६ सालच्या टी-२० विश्वचषकात त्याच्या स्पटक फलंदाजीने आणि निर्णायक षटकात घेतलेल्या विकेट्समुळे वेस्ट इंडीजला दुसऱ्यांदा जगज्जेतेपद भूषवता आले होते. २०१२ सालच्या जगज्जेतेपदातही त्याचा मोलाचा वाटा होता. निवृत्तीनंतरही रसल आता फ्रेंचायझी लीगमध्ये आपली फलंदाजी दाखवत राहणार आहे.

### भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्यांना सरकारची परवानगी

**मुंबई :** आशिया चषक २०२५ स्पर्धेचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. भारत सरकारने आशिया चषक स्पर्धेसाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ मान्यता दिली आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान यांच्यात वातावरण तापले होते आणि दोन्ही देशांकडून युद्धही पुकारले गेले होते. त्यामुळे आशिया चषक स्पर्धेत पाकिस्तानविरुद्ध खेळू नका, असा सूर होता. पण, आता भारत सरकारनेच लढतीला कोणताच विरोध नसल्याचे स्पष्ट केले.



भारताचे क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी, भारत-पाकिस्तान यांच्यात सर्व क्रीडा प्रकारात सामने होतील, हे स्पष्ट केले. आम्हाला कोणत्याही आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पाकिस्तानसोबत खेळण्यास कोणतीही अडचण नाही, मग ते क्रिकेट असो, हॉकी असो किंवा इतर कोणताही खेळ असो. पण जेव्हा द्विपक्षीय संबंधांचा विचार केला जातो तेव्हा सरकारची भूमिका सर्वांना माहिती आहे, मनसुख मांडविया, क्रीडा मंत्री आशिया चषक स्पर्धा सुरुवातीला ८ संघांची होणार होती, पण ती ६ संघांपर्यंत कमी केली जाऊ शकते असे दिसत आहे. आहे आणि भारत -पाकिस्तान हे दोनदा आमनेसामने येण्याची अपेक्षा आहे.

### बांगलादेशचा श्रीलंकेवर विक्रमी विजय

**श्रीलंका :** बांगलादेशचा संघ सध्या श्रीलंका दौऱ्यावर आहे. वनडे आणि कसोटी मालिकेचा थरार पार पडल्यानंतर आता दोन्ही संघांमध्ये टी-२० मालिकेचा थरार रंगला. या मालिकेत बांगलादेशच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी केली. मालिकेतील शेवटचा सामना कोलंबोत पार पडला. या सामन्यात श्रीलंकेला ८ गडी राखून पराभवाचा सामना करावा लागला. यासह श्रीलंकेला ही मालिका २-१ ने गमवावी लागली आहे. बांगलादेशला ही मालिका जिंकून देणाऱ्या कर्णधार लिटन दासच्या नावे रेकॉर्डची नोंद झाली आहे. टी-२० मालिकेआधी दोन्ही संघांमध्ये वनडे आणि कसोटी मालिका पार पडली. या दोन्ही मालिकांमध्ये बांगलादेशला पराभवाचा सामना करावा लागला. पण बांगलादेशने टी-२० मालिका जिंकून या दोन्ही मालिकेतील पराभवाचा बदला घेतला. ही मालिका जिंकताच कर्णधार लिटन दासच्या नावे मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे. लिटन दास हा परदेशात बांगलादेशचं नेतृत्व करताना टी-२० मालिका जिंकणारा बांगलादेशचा पहिलाच कर्णधारठरला आहे. याआधी बांगलादेशच्या कुठल्याही कर्णधाराला परदेशात टी-२० संघाचे नेतृत्व करताना २ मालिका जिंकता आल्या नव्हत्या. या सामन्यात श्रीलंकेचा संघ पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी मैदानावर आला होता. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेला २० षटकांअखेर ७ गडी बाद १३२ धावा करता आल्या. संघातील ६ फलंदाज दुहेरी आकडा गाठण्यात अपयशी ठरले. बांगलादेशकडून गोलंदाजी करताना मेहदी हसनने १६.३ धावा खर्च करत २ गडी बाद केले. बांगलादेशला जिंकण्यासाठी २० षटकात १३३ धावा करायच्या होत्या. आव्हान फार मोठं नव्हते, हे आव्हान १६.३ षटकात पूर्ण केले, आणि ही मालिका २-१ ने आपल्या नावावर केली.

### भारतीय फुटबॉलची स्थिती चिंताजनक!

**नवी दिल्ली :** भारतीय फुटबॉलमध्ये आधीच अनिश्चितता असताना देशातील अव्वल दर्जाची आयएसएल स्पर्धा स्थगित केल्यामुळे परिस्थिती अधिकच चिंताजनक झाल्याची टिप्पणी राष्ट्रीय संघाचा माजी कर्णधार सुनील छेत्रीने केली आहे.



काही आठवड्यांपूर्वी हंगामापूर्वीचे आपले सराव शिबीर दोन आठवड्यांनी पुढे ढकलण्यात आल्याचे बंगळूरु क्लबकडून सांगण्यात आले होते. मात्र, पुढे दोन आठवड्यांचे रूपांतर अनिश्चित काळात झाले. छेत्री आता कारकीर्दीच्या अंतिम टप्प्यावर आहे. त्यामुळे आणखी किती काळ खेळायला मिळणार याची सुरुवातीला चिंता वाटू लागली. मात्र, जेव्हा विविध क्लबमधील खेळाडूंशी संवाद साधला, तेव्हा केवळ स्वत:चा विचार करणे योग्य नसल्याचे जाणवले, असे छेत्रीने लिहिले. विविध क्लबचे खेळाडू, कर्मचारी, फिजिओ, मालिश करणाऱ्यांकडूनही चिंता व्यक्त करणारे दूरध्वनी आले आहेत. देशातील फुटबॉल परिसंस्थाच मुळात अनिश्चिततेचा सामना करत आहेत. फुटबॉल स्पोर्ट्स डेव्हलपमेंट लिमिटेड आणि अखिल भारतीय फुटबॉल महासंघ यांच्यात लीगच्या मुख्य अधिकारासाठी करण्यात आलेल्या मास्टर राइट्स कराराच्या (एमआरए) नूतनीकरणावरून संघर्ष सुरू आहे. यामुळे सध्या तरी ऑक्टोबरपासून सुरू होणारी आयएसएल स्थगित ठेवण्यात आली आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- पिक-अप ४०७, आयशट डंपर वरील ड्रायवर पाहिजे आहेत झिराड आणि मांडवा येथील संपर्क : ८८०६६८३२३२ /८००७८९३२३२
- अलिबागमधील ऑफिसकरीता सिवील सुपरवायझर. civil engineer व ड्राफ्टसमन पाहिजे. मो.नं. ९९७०३९१६९७
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. अकाऊंटंट (Accountant -Tally ERP+ GST, Advance Excel) वेटर, रिसेप्शनिस्ट, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मो. ७५५९१८४६१२
- गोंधळपाडा येथील गृहप्रकल्पाकरीता अनुभवी सिव्हील इंजिनिअर/साईट सुपरवाइजर पाहिजेत. संपर्क- ९५९५०४१६१२/८१८०८६१२३४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# बीसीसीआयला सोनेरी दिवस

## एकाच वर्षांत विक्रमी कमाई, जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेट बोर्ड

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमिअर लीग (आयपीएल) ही भारतीय क्रिकेट नियामक मंडळासाठी (बीसीसीआय) सोन्याचे अंड देणारी कोंबडी असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. आयपीएलच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेट बोर्डाच्या तिजोरीत पैसाच पैसा येत आहे. एका अहवालानुसार, बीसीसीआयने आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये कमावलेल्या एकूण महसुलापैकी ५९ टक्के वाटा एकट्या आयपीएलचा होता.

फ्रँचायझी आधारित टी-२० लीगमध्ये भारत आणि जगभरातील अव्वल क्रिकेटपटू सहभागी होतात. एका अहवालानुसार, बीसीसीआयने आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ९,७४१.७ कोटी रुपये महसूल मिळवला, ज्यात आयपीएलचा वाटा ५,७६१ कोटी रुपये आहे.

आयपीएल ही स्पर्धा सर्वोत्तम आहे. मीडिया हक्क सतत वाढत आहेत. आयपीएल हे रणजी ट्रॉफी स्तरावरील खेळाडूंना खेळण्याची संधी देखील देते. आयपीएलची वाढ होत असल्याने ती नफा मिळवत आहे.

आयपीएल वगळता बीसीसीआयला आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या प्रसारण हक्कांच्या विक्रीतून ३६१ कोटी रुपये मिळाले. रेडिफ्यूजनचे प्रमुख संदीप गोयल यांच्या मते, महसूल निर्मितीच्या बाबतीत बोर्डाने अद्याप आपली पूर्ण क्षमता ओळखलेली नाही, कारण रणजी ट्रॉफीसारख्या देशांतर्गतस्पर्धांचेव्यावसायिकीकरण करण्याची अफाट क्षमता आहे. रणजी ट्रॉफी ही भारतातील अव्वल श्रेणीतील देशांतर्गत लाल चेंडूची स्पर्धा आहे.

बीसीसीआयमध्ये रणजी ट्रॉफी, दुलीप ट्रॉफी किंवा सी.के. नायडू ट्रॉफीसारख्या पारंपरिक फॉरमॅटचे व्यावसायिकीकरण करून महसुलात वाढ करण्याची प्रचंड क्षमता आहे. बोर्डाकडे सुमारे ३०,००० कोटी रुपयांची गंगाजळी आहे, जी केवळ व्याजातून वर्षाला सुमारे १,००० कोटी रुपये मिळवून देते. हे उत्पन्न केवळ शाश्वत नाही तर वाढत्या प्रायोजकत्व, मीडिया करार आणि मॅचडे कमाईमुळे वार्षिक १०-१२ टक्क्यांनी वाढण्यास सज्ज आहे.




**बीसीसीआयची कमाई**

**बीसीसीआयने आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ९,७४१.७ कोटी रुपये महसूल मिळवला आहे. कमावलेल्या एकूण महसुलापैकी ५९ टक्के वाटा एकट्या आयपीएलचा होता. बोर्ड व्याजातून वर्षाला सुमारे १,००० कोटी रुपये कमवतात.**

२०२३-२४ मध्ये एकूण ९,७४१.७ कोटी कमाई केली. बीसीसीआयच्या कमाईत एकूण कमाईपैकी ५९ टक्के म्हणजे ५,७६१ कोटी आहे.

# ऍनेट गौडा यांची पदकांची कमाई

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

आशिया आफ्रिका पॅसिफिक पॉवरलिफ्टिंग आणि बेंचप्रेस चॅम्पियनशिप २०२५ इंटरनॅशनल पॉवरलिफ्टिंग फेडरेशन तसेच जपान पॉवरलिफ्टिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जपान येथे नुकतीच पार पाडली.



या स्पर्धेत ठाणे जिल्ह्यातील खेळाडू ऍनेट महेश गौडा हिने भारताचे प्रतिनिधित्व करत पाच पदके पटकावली. ८४ किलो वजनी गटात खेळून मास्टर-१ पॉवरलिफ्टिंग या प्रकरणात रौप्य पदक भारताला मिळवून दिले. यात स्कॉट या प्रकारात १४२.५ किलो रौप्य पदक, बेंच प्रेस ७५ किलो सुवर्णपदक, डेडलिफ्ट १४७.५ किलो कांस्यपदक ३६५ किलो वजन उचलून पॉवरलिफ्टिंग या प्रकरणात रौप्य पदक पटकाविले. तसेच आशिया आफ्रिका पॅसिफिक बेंचप्रेस चॅम्पियनशिप या स्पर्धेत ७५ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले.वयाच्या ४२ व्या वर्षी भारताला दोन सुवर्ण पदक, दोन रौप्यपदक तसेच १ कांस्यपदक मिळवून दिले.

गौडा यांच्या या उल्लेखनीय कामगिरीचा ठाणे जिल्हा अणि भारतीयांना सार्थ अभिमान आहे. गौडा या ठाण्याच्या रिओ फिटनेस मॅनेजमेंट या जिममध्ये स्वप्निल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करून तिने ही उत्तम कामगिरी केली आहे.

# प्रज्ञानंदची फ्रीस्टाईल बुद्धिबळ स्पर्धेत कार्लसनवर मात

**। लास वेगास । वृत्तसंस्था ।**

जागतिक पातळीवर नंबर १ चा मुकूट मिरवणाऱ्या मॅग्नस कार्लसनला मागच्या काही सामन्यात भारतीय बुद्धीबळपटूंकडून पराभवाची चव चाखावी लागली आहे. विश्वविजेत्या डी गुकेश याने त्याला चीतपट केले होते. आता युवा बुद्धिबळ ग्रँडमास्टर प्रज्ञानंदने त्याला पराभूत केले आहे. लास वेगासमध्ये फ्रीस्टाईल बुद्धीबळ ग्रँड स्लॅम स्पर्धेत प्रज्ञानंदने हा विजय मिळवला आहे. प्रज्ञानंदच्या बुद्धीबळ स्पर्धेच्या कारकिर्दीतील हा सर्वात मोठा विजय आहे. कारण त्याने फक्त ३९ डावातच खेळ खल्लास केला.



प्रज्ञानंदने चौथ्या फेरीत १० मिनिटं आणि १० सेकंदात कार्लसनचा पराभव केला. या सामन्यात प्रज्ञानंदची मजबूत पकड दिसून आली. त्याने ९३.९ टक्के अचूकता दाखवली. तर कार्लसनला फक्त ८४.९ टक्के सामना आपल्या ताब्यात ठेवण्यात यश आले. सरते शेवटी प्रज्ञानंद कार्लसनवर भारी पडला. आर प्रज्ञानंदने आठ खेळाडूंच्या व्हाईट ग्रुपमध्ये ४.५ गुणांसह संयुक्तपणे अव्वल स्थान पटकावले आहे. या स्पर्धेत प्रज्ञानंद क्लासिकल, रॅपिड आणि ब्लिट्झ या तिन्ही प्रकारात विजयी ठरला आहे.

आर प्रज्ञानंदने फ्रीस्टाइल ग्रँड स्लॅम टूरच्या टॉप ब्रॅकेटच्या उपांत्य पूर्व फेरीमध्ये प्रवेश केला आहे. दुसरीकडे, कार्लसनवर या पराभवाचा इतका परिणाम झाला की त्यातून तो सावरूच शकला नाही. पुढच्या फेरीत वेस्ली सो विरुद्ध पराभूत झाला आणि अमेरिकेच्या एरोनियनने टॉप ब्रॅकेटमध्ये जेतेपदाच्या शर्यतीतून आऊट झाला. कार्लसनने यापूर्वी पॅरिस आणि कार्लजूएतील फ्रीस्टाईल स्पर्धेचे ग्रँडस्लॅम जिंकण्यात यश मिळाले होते.

# पी. व्ही. सिंधू पहिल्याच फेरीत गारद

**। टोकियो । वृत्तसंस्था ।**

भारताची अनुभवी महिला खेळाडू पी. व्ही. सिंधू हिचा सुमार फॉर्म जपान ओपन बॅडमिंटन स्पर्धेत कायम राहिला. कोरियाच्या सिम यू जिन हिच्याकडून तिला पहिल्याच फेरीमध्ये पराभवाचा सामना करावा लागला. तिचे आव्हान संपुष्टात आले. यंदाच्या मोसमात ती पाचव्यांदा पहिल्या फेरीत पराभूत झाली. लक्ष्य सेन याने पुरुषांच्या एकेरीत, तर सात्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी यांनी पुरुषांच्या दुहेरीत विजय मिळवताना उल्लेखनीय खेळ केला.



सिंधू आणि सिम यू जिन यांच्यामध्ये महिला एकेरीची लढत रंगली. सिंधूने पहिल्या गेममध्ये संथ सुरुवात केली. या गेममध्ये तिच्याकडून चुका होत होत्या. अखेर सिम हिने २१-१५ असा हा गेम आपल्या नावावर केला. दुसऱ्या गेममध्ये सिंधूला सुरुवातीला १-६ अशा पिछाडीवर राहावे लागले. ब्रेकपर्यंत दोन्ही खेळाडूंमध्ये ११-११ अशी बरोबरी झाली; पण सिम हिने धडाकेबाज खेळ करताना २१-१४ असा हा गेम जिंकत सामन्यावर वर्चस्व गाजवले.

### भारताला जागतिक कसोटीत फटका

**नवी दिल्ली :** भारत आणि इंग्लंड संघात सध्या अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफी ही पाच सामन्यांची कसोटी मालिका सुरू आहे. पाचव्या दिवशी आम्ही नक्की जिंकू, असा दावा करणाऱ्या वॉशिंग्टन सुंदरने जोफ्रा आर्चरला विकेट देऊन तो माघारी परतला आणि नंतर सारेच गणित बिघडले. इंग्लंडने लॉर्ड्स कसोटीवर राज्या गाजवताना मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली. भारताला पराभवामुळे जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या (आयसीसी) गुणतालिकेत त्यांना धक्का बसला. ऑस्ट्रेलिया - २४ गुण, १०० टक्के इंग्लंड - २४ गुण, ७५ टक्के श्रीलंका - १६ गुण, ६६.६७ टक्के भारत - १२ गुण, २५ टक्के बांगलादेश - ४ गुण, १६.६७ टक्के गुण आहेत.

### आदितीचा फुटबॉलला अलविदा

**नवी दिल्ली :** भारतीय महिला फुटबॉलमधील एक महत्त्वपूर्ण पर्व आज संपले. युरोपमध्ये व्यावसायिक फुटबॉल खेळणारी पहिली भारताची महिला खेळाडू आदिती चौहान हिने वयाच्या ३२ व्या वर्षी सर्व प्रकारच्या फुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केली आहे. आदिती एक उत्कृष्ट गोलकीपर होती. ती भारतीय संघासाठी ५७ सामने खेळली असून सॅफ महिला अजिंक्यपद स्पर्धेत २०१२, २०१६ आणि २०१९ च्या विजेत्या संघाचे प्रतिनिधित्वही केले आहे. ती काही काळ भारतीय महिला फुटबॉल संघाची कर्णधारही होती. तसेच इंग्लंडमधील वेस्ट हॅम युनायटेड लेडीज या क्लबकडून खेळणारी ती पहिली भारतीय महिला ठरली होती. निवृत्तीनंतर चौहानने फुटबॉल प्रशिक्षण, महिला खेळाडूंचा विकास आणि खेळाबाबत जनजागृती यावर लक्ष केंद्रित करणार असल्याचे संकेत दिले आहेत.

# दिव्याची उपउपांत्यपूर्व फेरी धडक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

महिला बुद्धिबळ वर्ल्ड कपमध्ये भारताच्या दिव्या देशमुखने उपउपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या चीनच्या झू जिनरला पराभवाचा धक्का देत मोठा इतिहास घडवण्याच्या दिशेने पावले टाकली आहेत. तसेच आज झालेल्या अन्य लढतींमध्ये आर. वैशाली, हरिका द्रोणावली आणि कोनेरु हम्पी यांनी जोरदार विजयांची नेंद केली.



अवघ्या १८ वर्षांच्या नागपूरच्या दिव्या देशमुखने पांढरया मोहरयांनिशी खेळताना जबरदस्त खेळ आणि चतुराई दाखवत झू जिनरच्या चुकांना विजयी खेळात परावर्तित केले. या विजयामुळे ती दोन डावांच्या सामन्यात १-० अशी आघाडीवर असून दुसऱ्या डावात फक्त बरोबरी राखली तरी तिला उपांत्यपूर्व फेरी गाठता येणार आहे. जर दिव्या पुढील डावातही विजयी ठरली तर ती महिला वर्ल्ड कपच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचणारी केवळ दुसरी भारतीय खेळाडू ठरेल. यापूर्वी २०२३ मध्ये हरिका द्रोणावल्लीने अशी किमया साधली होती. अन्य लढतीमंध्ये आर. वैशालीने कझाकस्तानच्या मेरुएर्त कमालीडेनोव्हा विरुद्ध पांढऱ्या मोहऱ्यांनी सावध खेळ केला. हा सामना बरोबरीत सुटला. कोनेरू हम्पीने स्वित्झर्लंडच्या माजी विश्वविजेती अलेक्झांड्रा कोस्टेनियुक विरुद्ध बचावात्मक डाव खेळत बरोबरी साधत अर्धा गुण मिळवला. हरिका द्रोणावल्लीने रशियाच्या कात्येरिना लाग्नोविरुद्धचा डाव बरोबरीत सोडवला. या तिन्ही महिलांनी आपल्या सामन्याच्या पहिल्या डावात बरोबरी साधली असून आता दुसऱ्या निर्णायक डावात विजय मिळवण्यासाठी सज्ज झाल्या आहेत.

# रायगड जिल्ह्यातील तीन कराटेपटूंना ब्लॅक बेल्ट डिग्री प्रदान




**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग येथे नुकत्याच संचालक मंडळ नागाव हायस्कूल नागाव अलिबागमध्ये ब्लॅक बेल्ट व कलर बेल्ट यांची परीक्षा संपन्न झाली. इंडियन ओकिनावा शोरीन रियू क्युडोकान कराटे-डो इंडियाच्या रायगड व नाशिक जिल्ह्यातील एकूण ३८ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी सहभाग घेतला होता.

यामध्ये ईशान पोवळे, तनिष पाटील, दुर्वा नाईक या तिघांनी यशस्वीरित्या ब्लॅक बेल्टची परीक्षा उत्तीर्ण झाले. या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरिय, विभागस्तरिय, राज्यस्तरिय, राष्ट्रीयस्तरिय व आंतरराष्ट्रीय या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला होता. या संस्थेचे प्रशिक्षण नागाव येथे गेली अनेक वर्षे सातत्याने चालू आहे. तशीच यांची शाखा आलिबाग व मुरुड या तालुक्यांमध्ये सातत्याने कराटेचे प्रशिक्षण वर्ग चालू आहेत. सर्व विद्यार्थ्यांना कराटे प्रशिक्षक सिहान, अरुण बोडके, रेंशी, अरविंद भोपी, प्रसाद चौलकर, राधा ढापरे, अनुश्री भोपी, वेद पाटील यांचे सहकार्य लाभले. शाळेचे संचालक, मुख्याध्यापक, कर्मचारी तसेच पालक वर्गाने भरभरून कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## भारतीय संघाचे नेतृत्व युवराजकडे | स्पर्धेत सहा संघाचा सहभाग

# भारत-पाकिस्तान येणार आमने-सामने

**। सिंगापूर । वृत्तसंस्था ।**

वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्स २०२५ स्पर्धेची सुरुवात १८ जुलैपासून होणार आहे. माजी दिग्गज खेळाडू या स्पर्धेत खेळतात. यंदा स्पर्धेचे दुसरे पर्व आहे. मागच्या पर्वात भारताने जेतेपद मिळवले होते. युवराज सिंगच्या नेतृत्वात भारतीय संघ मैदानात उतरणार आहे. भारताचा पहिला सामना शाहीद आफ्रिदीच्या नेतृत्वाखालील पाकिस्तानशी होणार आहे. या स्पर्धेतील हा चौथा सामना असणार आहे. भारतीय संघात शिखर धवन, सुरेश रैना, हरभजन सिंग या सारखे दिग्गज खेळाडू खेळणार आहेत. तर पाकिस्तान पहिला सामना इंग्लंडविरुद्ध खेळणार आहे.




त्यानंतर २० जुलैला भारत आणि पाकिस्तान हे संघ आमनेसामने येणार आहेत. इंडिया चॅम्पियन्स आणि पाकिस्तान चॅम्पियन्स यांच्यातील सामना भारतीय वेळेनुसार रात्री ९ वाजता सुरु होणार आहे. यामुळे क्रीडारसिकांना पुन्हा एकदा भारत पाकिस्तान सामना पाहण्याची पर्वणी मिळणार आहे. ऑपरेशन सिंदूर दरम्यान गरळ ओकणारा शाहीद आफ्रिदी समोर असणार आहे.

स्पर्धेत एकूण सहा संघ असून भारताचे नेतृत्व युवराज सिंग, पाकिस्तानचे नेतृत्व शाहीद आफ्रिदी, दक्षिण अफ्रिकेचे नेतृत्व एबी डिव्हिलियर्स, वेस्ट इंडिजचे नेतृत्व ख्रिस गेल, इंग्लंडचे नेतृत्व इऑन मॉर्गन आणि ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व ब्रेट ली करणार आहे. या स्पर्धेतील पहिला सामना इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यात १८ जुलैला होणार आहे. तर अंतिम फेरीचा सामना २ ऑगस्टला होणार आहे. या स्पर्धेत ६ डबल हेडर सामने असणार आहेत. यात १९ जुलै, २२ जुलै, २७ जुलै, २९ जुलै, ३१ जुलैला प्रत्येकी दोन सामने असणार आहेत.

**दोन्ही संघाचे खेळाडू**

**भारताचा संघ :** शिखर धवन, सुरेश रैना, युवराज सिंग (कर्णधार), गुरकीरत सिंग, इरफान पठाण, स्टुअर्ट बिन्नी, युसूफ पठाण, अंबाती रायुडू (यष्टीरक्षक), रॉबिन उथप्पा (यष्टीरक्षक), अभिमन्यू मिथुन, हरभजन सिंग, पवन नेगी, पियुष कुमार, वरुण कुमार, वरुण कुमार, अंबाती रायडू.

**पाकिस्तानचा संघ :** शर्जील खान, कामरान अकमल, युनूस खान, मिसबाह-उल-हक, सर्फराज अहमद (यष्टीरक्षक), शोएब मलिक, शाहिद आफ्रिदी (कर्णधार), अब्दुल रज्जाक, वहाब रियाझ, सईद अजमल, सोहेल तन्वीर, सोहेल खान, आसिफ अली, सोहेब मकसूद, आमिर यामीन.

### नायरच्या ‘दुसऱ्या संधी’चा अंत

**नवी दिल्ली :** इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या कसोटी सामन्यासाठी भारतीय संघातील करुण नायरचे स्थान धोक्यात आले असून, त्याच्या जागी साई सुदर्शनला संधी मिळण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. ओल्ड ट्रॅफर्ड येथे २३ जुलैपासून सुरू होणाऱ्या या सामन्यात, तिसऱ्या क्रमांकावर हा एकमेव बदल अपेक्षित आहे. पाच सामन्यांच्या मालिकेत आपले आव्हान टिकवण्यासाठी भारताला हा सामना जिंकणे अत्यंत आवश्यक आहे. आठ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर कसोटी संघात पुनरागमन करणाऱ्या नायरला या दौऱ्यातील सहा डावांमध्ये चांगली सुरुवात मिळाली, परंतु त्याला मोठ्या धावसंख्येत रूपांतर करण्यात अपयश आले आहे.



# मस्त मॅसेडोनिया

**सफर देशांची**

मॅसेडोनिया हा दक्षिणपूर्व युरोपमधला देश आहे. एके काळी इथे राजेशाही होती. मॅसेडोनियन साम्राज्य बऱ्याच मोठ्या भूभागावर पसरलं होतं. मात्र आता या देशाचा आकार बराच छोटा आहे. पर्वत, तलाव, झाडं आणि विविध प्रजातींचे प्राणी ही या देशाची ओळख बनली आहे. स्कॉप्जे ही मॅसेडोनियाची राजधानी. बल्गेरिया, ग्रीस, सर्बिया आणि अल्बानिया हे याचे शेजारी देश. मॅसेडोनिया हा चारही बाजूंनी जमिनीने वेढलेला देश आहे. माउंट कोराब हे या देशातलं सर्वात उंच शिखर. या देशात मोठ्या टेकड्या, खोल दऱ्या आणि त्याच्या सभोवताली पर्वतरांगा असं निसर्गसौंदर्य पहायला मिळतं. देशात पाण्याचे ११०० पेक्षा जास्त स्रोत आहेत. यात ओहरिड, प्रेस्पा, डोइरॅन अशा तलावांचा समावेश आहे. ब्रॅगॅल्निका, सिरना आणि वरदार या इथल्या प्रमुख नद्या आहेत. वरदार नदी या देशाच्या मधून वाहत ग्रीसपर्यंत जाते.

मॅसेडोनियातलं तापमान सौम्य स्वरुपाचं असतं. इथे विविध प्रजातींचे प्राणी आणि झाडंझुडपं पहायला मिळतात. या देशात तीन राष्ट्रीय उद्यानं आणि संरक्षित प्रकल्प आहेत. अस्वलं, हरणं आणि लांडगे देशाच्या डोंगराळ भागात फिरताना दिसतात. या देशात झाडांच्या ३५०० पेक्षा अधिक प्रजाती पहायला मिळतात. या देशाला प्राचीन वारसा लाभला आहे. इसवीसनपूर्व ८०८ मध्ये कॅरॅनसने मॅसेडोनियाचं साम्राज्य प्रस्थापित केलं आणि संपूर्ण युरोपभर पसरवलं. दुसऱ्या फिलिपने मॅसेडोनियाच्या सर्व शेजाऱ्यांचा पराभव केला. अलेक्झांडर द ग्रेट हा फिलिपचा मुलगा. त्याने संपूर्ण जगावर राज्य केलं. मात्र त्याच्या मृत्यूनंतर या साम्राज्याची वाताहत झाली. विविध युरोपियन देशांनी या देशावर राज्य केलं. १९९१ मध्ये या देशाला युगोस्लाव्हियाकडून स्वातंत्र्य मिळालं.

# मनोरंजक बीच क्रिकेट

छोट्या दोस्तांनो, तुम्ही बीचवर गेल्यावर क्रिकेट खेळत असाल. वाळूमध्ये क्रिकेट खेळण्याची मजा काही वेगळीच असते. तुम्ही गंमत म्हणून बीच क्रिकेट खेळता. पण इंग्लंडमध्ये बीच क्रिकेटची स्पर्धा रंगते. या स्पर्धेचे नियम सहभागी होणारे संघ ठरवतात.

**फन टाईम**



दर वर्षी इथे या स्पर्धेचं आयोजन केलं जातं. मे ते सप्टेंबर या काळात बीच क्रिकेट स्पर्धा रंगते. शीप इन क्लबतर्फे या स्पर्धेचं आयोजन केलं जातं. ब्रिटनमध्ये या एकाच क्लबकडे बीच क्रिकेटचं पीच आहे. हे पीच समुद्राच्या लाटेत वाहून जातं. मग दोन ते तीन दिवसांनी रोलर फिरवून नवं पीच तयार करावं लागतं. वेस्ट इंडिजमध्ये समुद्रकिनारे असल्यामुळे बीच क्रिकेट खेळलं जातं. तिथूनच ही संकल्पना ब्रिटनमध्ये पोहोचली. बीच क्रिकेट स्पर्धेचे नियम गल्ली क्रिकेटसारखेच असतात. या स्पर्धेत वाईड आणि नो बॉल दिला जात नाही. ही स्पर्धा मनोरंजनासाठी भरवली जात असल्याने कोणीही यात सहभागी होऊ शकतो. इथे खेळाडूंना स्वत:च धावसंख्या लक्षात ठेवायची असते. प्रत्येक बॉलनंतर ओरडून स्कोअर सांगावा लागतो. बरेचदा फलंदाजालाच लांब गेलेला बॉल घेऊन यावा लागतो. फिल्डरने एका हाताने झेल घेतला तर फलंदाजी करणाऱ्या संघाचा डाव संपतो. विकेट्स आणि ओव्हर उरल्या असल्या तरी त्यांना डाव संपवावा लागतो. तर अशी ही भन्नाट बीच क्रिकेट स्पर्धा खेळावीशी वाटतेय ना?

# कार्टूनचे पपेट्स

**करून तर बघा**

मुलांनो, तुम्हाला पपेट्स माहीत आहेत ना? पपेट्स म्हणजेच बोलक्या बाहुल्या. विविध आकारांचे पपेट्स बोटात घालून त्यांचा आवाज काढून खेळायला खूपच गंमत वाटते. असे पपेट्स तुम्ही बनवू शकता. तुमच्या आवडत्या प्राण्यांचे, कार्टून्सचे पपेट्स बनवून मित्रमंडळींसोबत तुम्ही छान छान खेळही खेळू शकता.



**साहित्य :** आईस्क्रिमच्या काड्या, सुती किंवा लोकरी कापड, डोळे आणि गम.

**कृती :** ✻ सर्वात आधी सुती किंवा लोकरी कापडापासून विविध आकार कापून घ्या. तुम्हाला प्राण्यांच्या शरीराचे दोन एकसारखे आकार लागतील. यासोबतच कान, नाक आणि इतर अवयवांचे हवे तसे आकार कापून घ्या. ✻ प्राण्यांच्या शरीरावर तुम्ही कान चिकटवून घ्या. मग कापडाच्या उलट्या बाजूला कडेने गम लावून घ्या. त्यानंतर काडीला गम लावून ती मध्यभागी चिकटवा. ✻ त्यानंतर दोन सारख्या आकारांपैकी दुसरा आकार कडेला गम लावलेल्या भागावर नीट दाबून चिकटवा. ✻ मग डोळे, नाक, हात, पाय तसंच अन्य काही अवयव असतील तर ते चिकटवून घ्या. उंदीर, मांजर, वाघ अशा प्राण्यांना तुम्ही मिशा चिकटवू शकता. यासाठी काळा दोरा किंवा वेल्वेट पेपरचा वापर करता येईल. ✻ अशा प्रकारे कल्पनाशक्ती लढवून तुम्ही वेगवेगळ्या प्रकारचे प्राणी, पक्षी तयार करू शकता. ✻ हे पपेट्स तयार केल्यानंतर तुम्ही प्राण्यापक्ष्यांचे आवाज काढून पपेट शो सादर करू शकता.

# संधी कॉम्प्युटर इंजिनिअरिंगनंतरच्या

कॉम्प्युटर इंजिनिअरिंगला इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर सायन्सचं मिश्रण मानलं जातं. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी आणि ॲप्लिकेशन्सकडे लोकांचा कल वाढत चालल्याने कॉम्प्युटर इंजिनिअर्ससाठी बऱ्याच संधी निर्माण झाल्या आहेत. खासगी क्षेत्रासोबतच सरकारी क्षेत्रातही आता कॉम्प्युटर इंजिनिअर्सना नोकऱ्या मिळतात. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे उपविभाग असणाऱ्या सॉफ्टवेअर, हार्डवेअर, नेटवर्किंग, डेटाबेस, कम्युनिकेशन याबाबतची धोरणं आखण्यासोबतच नव्या योजना तयार करण्यासाठी या तज्ज्ञांची गरज लागते. देशात माहिती तंत्रज्ञानाचं क्षेत्र विस्तारण्याच्या कामात या कॉम्प्युटर इंजिनिअर्सची मदत होते. ही पदवी मिळवल्यानंतर तुम्ही सरकारी नोकरी मिळवू शकता.

**कोण होणार?**

सिस्टिम इंजिनिअर, सॉफ्टवेअर डेव्हलपर, हार्डवेअर इंजिनिअर, सिस्टिम ॲनालिस्ट, नेटवर्किंग इंजिनिअर, डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर, कॉम्प्युटर प्रोग्रामर, सॉफ्टवेअर टेस्टर अशा विविध भूमिका या क्षेत्रातल्या तज्ज्ञांना पार पाडाव्या लागतात. कॉम्प्युटर इंजिनिअरींगची पदवी घेतल्यानंतर तुम्ही सरकारी नोकऱ्यांसाठी अर्ज करू शकता. वरिष्ठ पदांसाठी अर्ज करताना मास्टर्स पदवीची गरज लागते. इस्रो, उच्च न्यायालय, एचआयएल, ईसीआयएल, एनटीआरओ अशा सरकारी संस्थांमध्ये तुम्ही नोकरीसाठी अर्ज करू शकता.



## दोस्त हे मस्त

### कासवांच्या जगात



मुलांनो, आज आपण कासवाविषयी माहिती घेऊ. कासवाच्या पाठीवरचं कवच खूप टणक असतं. त्यावर दगड मारला तरी कासवाला काहीच त्रास होत नाही. हे कवच त्यांच्या शरीराचा भाग असल्याने काढता येत नाही. कासवाच्या तोंडात दात नसतात. त्याऐवजी पातळ चकतीसारखं हाड असतं. त्याचा वापर ते खाण्यासाठी करतात. जमिनीवर रहाणारी आणि पाण्यातली अशी दोन प्रकारची कासवं असतात. जमिनीवरची बरीच कासवं शाकाहारी असतात तर पाण्यातली कासवं छोटे मासे किंवा पाण्यात रहाणारे छोटे जीव जंतू खातात.

**खादाडी**

### कॉलिफ्लॉवर पकोडे

छोट्या दोस्तांनो, तुम्ही फ्लॉवरचा वापर करून एक मस्त पदार्थ बनवू शकता. कॉलिफ्लॉवर पकोडे असं या पदार्थाचं नाव. यासाठी फ्लॉवरचे छोटे तुकडे घ्या. पाऊण वाटी मैदा घ्या. २ टेबलस्पून टॉमेटो सॉस, अर्धी वाटी ताक, दोन कप ब्रेडचा चुरा आणि मीठ असे पदार्थ जमवा. एका मोठ्या भांड्यात ताक, मैदा, टॉमॅटो सॉस आणि मीठ घाला. मिश्रण एकत्र करा. या मिश्रणात फ्लॉवरचे तुकडे घाला. ते ब्रेडच्या चुऱ्यात घोळा. कढईत तेल गरम करा. फ्लॉवरचे तुकडे लालसर रंगावर तळून घ्या. कॉलिफ्लॉवरचा चटपटीत अवतार तयार आहे.



**घ्या काळजी**

### नेलपॉलिश लावताय?



मुली वरचेवर नेलपॉलिश लावतात. पण मुलींनो, तुमची नखं खूप नाजूक असतात. सतत नेलपॉलिश लावल्यामुळे नखं कोरडी होतात. पिवळी पडू लागतात. नेलपॉलिशमधल्या रासायनिक घटनांमुळे आपल्याला आजार होऊ शकतात. त्यामुळे एखादा कार्यक्रम असेल तेव्हाच नेलपॉलिश लावा. शक्यतो उजव्या हाताच्या नखांना नेलपॉलिश लाऊ नका. यामुळे तुमची नखं आणि आरोग्य दोन्ही चांगलं राहिल.

**योगा टाईम**

### असं आहे चक्रासन

मुलांनो, तुम्ही चक्रासन करू शकता. यासाठी जमिनीवर झोपा. दोन्ही पाय दुमडून घ्या. आता हातांचे दोन्ही पंजे खांद्याखाली ठेवा. दीर्घ श्वास घ्या. श्वास सोडताना शरीराचा कंबरेखालचा भाग वर उचला. पुन्हा श्वास घेऊन वरचा भागही वर उचला. ६० ते ९० सेकंद या स्थितीत रहा. मग श्वास सोडताना पहिल्यांदा कंबरेखालचा भाग जमिनीला टेकवा आणि वरचा भाग खाली आणा.



# पॅच बांधा, मस्त राहा




दोस्तांनो, उन्हाळ्यात खूप उकडतं आणि हिवाळ्यात आपण कुडकुडत असतो. घरात एसी किंवा हिटर असला तरी बाहेर पडल्यावर आपल्याला त्रास होतो. हीच अडचण दूर करण्याचा प्रयत्न अमेरिकेतल्या शास्त्रज्ञांनी केला. कॅलिफोर्नियाच्या सॅन डिएगो विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी एक पॅच विकसित केला. हा पॅच शरीरावर बांधल्यानंतर बाहेरच्या तापमानानुसार आपलं शरीर थंड किंवा गरम रहातं.

**व्हॉट्स न्यू?**

एखाद्या पट्ट्याप्रमाणे हा पॅच हातावर बांधता येतो आणि अगदी सहज कुठेही कॅरी करता येतो. तो मुलायम असल्यामुळे बराच काळ हातावर बांधून ठेवता येईल. यात वेगळ्या प्रकारची बॅटरी बसवण्यात आली आहे. पॅच ताणला गेला तरी ती खराब होत नाही. हा पॅच हातावर बांधला की तुम्हाला उन्हाळा किंवा थंडी जाणवणार नाही, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. यामुळे संपूर्ण शरीर थंड किंवा गरम राहू शकेल. तापमानात चढउतार अनुभवणाऱ्या भागांमधील लोकांना हा पॅच खूप उपयुक्त ठरू शकेल. त्यात थर्मो इलेक्ट्रिक मटेरियलचा वापर करण्यात आला आहे. हा शोध अनोखा म्हटला पाहिजे.

**ठिपके जुळवा**



# कॅलेंडर्सची धमाल दुनिया

नववर्ष वाजत गाजत सुरू झालंय. तुमच्या घरातही भिंतीवर नवं कोरं कॅलेंडर दिमाखात लागलं असेल. तुम्हाला माहितेय, जगात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या दिवशी नववर्ष साजरं होतं. अर्थातच त्यानुसार कॅलेंडर्सचेही वेगवेगळे प्रकार पहायला मिळतात. भारतातच जवळपास ५० प्रकारची कॅलेंडर्स पहायला मिळतात.

**माहीत आहे?**

✻ ग्रेगोरियन कॅलेंडर – हे कॅलेंडर जगभर प्रसिद्ध आहे. पोप ग्रोगरी (१३वे) यांनी १५८२ मध्ये या कॅलेंडरची निर्मिती केली.









✻ भारतामध्ये विक्रम संवत, शक संवत, हिजरी संवत, फसली संवत, बांगला संवत, बौद्ध संवत, जैन संवत, खालसा संवत, तमिळ संवत, मल्याळम संवत, तेलगू संवत आदी प्रचलित आहेत.

✻ विक्रम संवत गुप्त सम्राट चंद्रगुप्त विक्रमादित्यानं उज्जनीच्या शकांना पराजित केल्याच्या स्मृतीप्रित्यर्थ सुरू केलं. हे वर्ष चैत्र महिन्याच्या शुक्ल प्रतिपदेपासून सुरू होतं.

✻ शक संवतला शालिवाहन शकही म्हणतात. शक सम्राट कनिष्क यानं इ.स. पूर्व ७८ मध्ये सुरु केलं.

✻ रोमन कॅलेंडर जगातील सर्वात पहिलं कॅलेंडर समजलं जातं. यानुसार मार्चमध्ये नववर्ष सुरु होतं.

✻ हिजरी कॅलेंडर हे इस्लाम मधील हिजरी वर्षाच्या नावानं सुरु झालेलं कॅलेंडर आहे. या कॅलेंडरनुसार नवीन वर्ष मोहरमच्या महिन्यापासून सुरु होतं.

✻ आपला शेजारी देश असणाऱ्या चीनमध्येही वेगवेगळी कॅलेंडर बघायला मिळतात.

# गरज रेनडिअर्स वाचवण्याची

रेनडिअर या प्राण्याबद्दल तुम्ही ऐकलं असेलच. गायीसारख्या दिसणाऱ्या या प्राण्याला भलीमोठी शिंगं असतात. पण हा प्राणी हरणाच्या जातीचा आहे. तर जाणून घेऊया रेनडिअरबद्दल...

रेनडिअर उत्तर युरोप, उत्तर अमेरिका, आशिया आणि ग्रीनलॅण्ड या भागात आढळतात. या भागात बर्फ पडायला लागल्यानंतर रेनडिअर कळपाकळपाने दक्षिणेकडे स्थलांतरित होतात. या भागात ते निवारा शोधतात. अन्न मिळवण्यासाठी शिंगाच्या सहाय्याने खोदकाम करतात. त्यांच्या शिंगात खूप शक्ती असते. त्यामुळे बर्फवृष्टी झाली तरी बर्फ खोदून ते आपलं अन्न शोधू शकतात.



**प्राणी जगत**

रेनडिअर हिवाळ्यात दक्षिणेकडे जातात त्याचप्रमाणे उन्हाळ्यात पुन्हा उत्तरेकडे स्थलांतरित होतात. त्यांचं स्थलांतर पृथ्वीवरचं सर्वात मोठं स्थलांतर आहे. या काळात ते जवळपास ६०० मैल म्हणजेच ९६५ किलोमीटर अंतर पार करतात. टुंड्रा प्रदेशात मिळणारं गवत, मशरूम आणि वनस्पती हे त्यांचं उन्हाळ्यातलं अन्न असतं. रेनडिअर हिवाळ्यात दक्षिणेकडे स्थलांतरित होतात तर उन्हाळ्यात पुन्हा उत्तरेकडे येतात. वर्षभराच्या काळात ते तब्बल १६०० मैल म्हणजेच २,५७४ किलोमीटरचं अंतर पार करतात. एक प्रौढ रेनडिअर दिवसाला पाच किलो अन्न फस्त करतो.

रेनडिअरची मोठ्या प्रमाणावर शिकार झाली आहे. त्यामुळेच वूडलॅण्ड रेनडिअरचा समावेश धोकादायक प्रजातींमध्ये झाला आहे. पण इतर रेनडिअरची संख्या मात्र स्थिर आहे. त्यामुळे वूडलॅण्ड रेनडिअरची शिकार थांबवण्याची गरज आहे. रेनडिअर साधारणपणे पंधरा वर्ष जगतात.




## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) मेघालयची राजधानी कोणती?
२) फिरोजशाह कोटला मैदान कोणत्या शहरात आहे?
३) सीबीएसईचं पूर्णरुप काय?
४) साप वारंवार जीभ का बाहेर काढतो?
५) ऑलिम्पिकमधला कोणता खेळ दाढी ठेऊन खेळता येत नाही?
६) पृथ्वीला मिळणाऱ्या ऊर्जेचा प्रमुख स्रोत कोणता?
७) कॉम्प्युटरच्या की बोर्डच्या वरच्या पट्टीवर नसणारा एकमेव स्वर कोणता?
८) नाईल नदी कोणत्या देशात समुद्राला मिळते?
९) एका सहस्त्रकात किती वर्षं असतात?
१०) जपानमध्ये निवडणूक जिंकणारी भारतीय वंशाची पहिली व्यक्ती कोण?

उत्तरं : १) कोहिमा २) नवी दिल्ली ३) सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन ४) हवेची चव घेण्यासाठी ५) बॉक्सिंग ६) सूर्य ७) ए ८) इजिप्त ९) एक हजार १०) योगेंद्र पुराणिक




# विठाबाई नारायणगावकर
## एक अद्भूत तमाशा कलावंत

एकेकाळी तमाशा क्षेत्रात दुमदुमलेले नाव म्हणजे विठाबाई नारायणगावकर. अंगावर शहारे आणणारा तो अद्भूत प्रसंग. ''पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची'' ही लावणी ज्यांनी अजरामर केली त्या विठाबाई स्टेजवर नाचत होत्या. नाचता नाचता पोटात बाळंतपणाच्या कळा येऊ लागल्या. स्टेजवर मागे असणाऱ्या तंबूत जाऊन विठा बाळंत झाली. बाळाची नाळ दगडाने ठेचून विठा पून्हा स्टेजवर आली. मुलगी झाल्याची बातमी सांगून स्टेजवर नाचू लागली. प्रेक्षकांनी हात जोडून सांगितले विठाबाई आराम करा आमचे पैसे फिटले. आपल्या कलेशी ईमान राखणारी अशी कलावंत होणे नाही.



श्रीराम शेटये

वयाच्या १० व्या वर्षापासून पायात घुंगरू बांधून कलाकार म्हणून प्रेक्षकांवर हुकुमत गाजवणारी लावणी नृत्यांगना. सावळा, परंतु देखणा चेहरा, गोड गळा आणि त्याच्या वरचढ अभिनय अशा कोंदणात चमचमणाऱ्या विठाबाई नारायणगावकर यांचा दि. १६ जुलै जन्मदिन. (जन्म. १६ जुलै १९३५)

पुरुषांच्या जगात वावरलेल्या विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर जिवंतपणीच दंतकथा बनल्या. लफडेबाज, विकृत, व्यसनाधीन असे हिणवून निंदानालस्ती करणाऱ्यांची पर्वा न करता मायबाप प्रेक्षकांनी विठाबाईना 'तमाशासम्राज्ञी' ही पदवी बहाल केली. लहानपणापासून होत असलेली उपासमार, वयाच्या दहाव्या वर्षापासून सुरू झालेली विठाबाईची तालीम, १५ वर्षे वयाच्या कोवळ्या वयात एका व्यापाऱ्याने केलेला बलात्कार, त्यातून स्वत:च्या तारुण्याची झालेली विखारी जाणीव, पुढे याच मानसिकतेत तारुण्याच्या जोरावर नाव कमावलेली धाडसी नृत्यांगना, प्रेक्षकांवर हुकुमत गाजवणारी कलासक्त स्त्री. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि एकूणच कारकीर्दीचा आवाका ध्यानात घेता हे लिखाण तुटपुंजे असले तरी त्यांच्याबद्दलच्या ऐकीव कहाण्या मात्र विपुल आहेत.

भाऊ बापू (मांग) नारायणगावकरांचा तमाशा महाराष्ट्र गाजवत होता तेव्हाचा काळ! सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर या गावी भाऊ खुडेंची बायको शांताबाई गरोदर होती. त्या दिवशी तमाशाचा मुक्काम पंढरपूरला होता. ती आषाढी एकादशीची रात्र होती. रात्री भाऊंच्या तमाशाचा फड उभा राहिला आणि इकडे शांताबाईंच्या वेणा वाढू लागल्या. मध्यरात्रीच्या सुमारास शांताबाईंनी एका गोंडस मुलीला जन्म दिला. पंढरपूरच्या विठोबाच्या छायेत मुलगी झाली म्हणून भाऊ आणि शांताबाईंनी तिचं नाव विठा ठेवलं.पण तमाशाच्या फडाला आणि पहाटेच्या सूर्याला साक्षी ठेवून जन्माला येऊन विठानं जणू नेमकी वेळ साधली. कारण विठा नामक हे नक्षत्र पुढे तमाशा विश्वावर तेजाने तळपलं. भाऊ खुडेच्या या लेकीनं पुढं महाराष्ट्राला आपल्या तालावर नाचवलं. विठाबाई भाऊ नारायणगावकर या नावाने तमाशाला दिल्लीच्या तख्तापर्यंत नेलं.

विठाबाईंचे वडील भाऊ खुडे आणि चुलत भाऊ बापू खुडे यांचा भाऊ-बापू (मांग) नारायणगावकर हा तमाशा अस्सल लोककलेचा नमुना तर होताच पण सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे तमाशा हे या कलावंतांसाठी समाज सुधारणेचं एक माध्यम होतं. लहानपणापासूनच नृत्य आणि गायनाकडं विठाबाईंचा विशेष ओढा होता. घरी असताना तमाशातल्या लावण्या, गवळणी, भेदीक त्यांच्या कानावर आपसूक पडत होत्या. पण शाळेतही कवितेमध्ये विशेष रुची होती. त्यांचा हा कलेकडचा आत्यंतिक ओढा बघूनच वडिलांनी शिक्षणाची सक्ती केली नाही आणि वयाच्या चौथ्या - पाचव्या वर्षीच विठाबाईंची शाळा कायमची बंद झाली. आता त्या आपल्या वडिलांच्या तमाशाबरोबर भटकंती करू लागल्या. याच सुमारास मामा वरेरकर - आळतेकर आपल्या कलापथकातून एकांकिका आणि पथनाट्याच्या माध्यमातून समाजजागृती करत होते. भाऊ-बापूचा तमाशा पाहून ते खूपच प्रभावित झाले. भाऊ आणि बापू तमाशातून त्यांच्यासारखेच समाजप्रबोधन करत होते. त्यामुळे मामा वरेरकरांचा आणि भाऊ - बापूंचा विशेष स्नेह जुळला.

भाऊ-बापूच्या तमाशात आता अधून-मधून विठाबाई आपल्या कलेची चुणूक दाखवून जात होत्या. ही कला मामा वरेरकरांनी नेमकी हेरली आणि विठाबाईंना आपल्या कलापथकात पाठवून द्यायची विनंती भाऊंना केली. भाऊंनी ती तात्काळ मान्य केली आणि विठाबाई मामा वरेरकरांच्या कलापथकातून काम करू लागल्या. त्यामुळे त्यांच्या अनुभवाच्या आणि शिकण्याच्या कक्षा रुंदावल्या. देशाविषयी, समाजाविषयी एक भूमिका तयार झाली. तमाशात आत्मसात केलेल्या कलेला आणखी पैलू पडले. त्यात शास्त्रशुद्धपणा आला. आपल्या कलेत त्या आणखी निपुण झाल्या.

याच दरम्यान भाऊ-बापूंचा तमाशा कोळे या गावी मुक्कामाला होता. तिथं भाऊ अकेलकर यांनीही आपल्या तमाशाचा फड उभारला होता. दोन्ही फडांनी एकमेकांना आव्हान दिलं आणि त्या रात्री दोघांमध्ये 'भेदीक' सुरू झाली. सवाल-जबाब सुरू झाले. कुणीच कुणाला हार जात नव्हतं. पण अकेलकरांच्या नुकत्याच वयात आलेल्या मुलीने 'अशी कोणती रूपाची खाण तुझ्या गाठीला आहे', असा सवाल करत बापूंना निरुत्तर केलं. भाऊंना ही हार जिव्हारी लागली. या पराभवानं विठाबाईही पेटून उठल्या आणि लागलीच बाडबिस्तारा आवरून कराडच्या वाटेला लागल्या.

त्या रात्री पुन्हा एकदा दोन्ही तमाशात भेदीक जुंपली आणि ती जुगलबंदी जिंकून विठाबाईंनी आपल्या वडिलांना हरविल्याचा पुरेपूर बदला घेतला. त्या रात्री विठाबाईंचं बोर्डावर पाय ठेवणं ऐतिहासिक होतं. ती त्यांच्या पुढच्या देदिप्यमान प्रवासाची नांदी होती. त्यावेळी विठाबाई फक्त तेरा वर्षांच्या होत्या. दिवस जात होते तशी विठाबाईंची कला रसिकांना भुरळ घालत होती. नृत्यात आणि गायनात त्या खूप सरस होत्या. गवळणी, लावण्या, मराठी-हिंदी चित्रपटातली गीतं सुरेल आवाजात म्हणत असत. ढोलकीच्या तालावर नाचणाऱ्या विठाबाईंना पाहणं हा एक अपूर्व आनंद असे. त्यांच्यामुळे तमाशाला एक वेगळंच वलय प्राप्त होत होतं.

तमाशातल्या कलावंतीणीचं आयुष्यही विठाबाईंच्या हळू-हळू अंगवळणी पडत होतं. तमाशातल्या बायकांची लग्न होत नाहीत हे त्यांना ठाऊक होतं. तमाशातल्या कलावंतांचं आयुष्यच खूप निराळं! बहुतेक पुरुष त्यांचं लग्न झालेलं असूनही त्यांच्या बायका-पोरांना गावी ठेवून तमाशातल्याच एखाद्या कलावंतीणीशी संधान बांधत. ती कलावंतीण जराशी थकली किंवा तिच्याशी बिनसलं की, ते तिला सोडून देत आणि दुसऱ्या कलावंतीणीबरोबर घरोबा सुरू करत. ती कलावंतीण मग दुसरा आधार शोधत असे. त्यांच्या संबंधातून जन्माला आलेली संतती फडावरच लहानाची मोठी होत असे. शाळेचं शिक्षण या मुलांपासून कोसो दूर असे. ही मुलं जरा कळती झाली की, फडावरच जुजबी कामं करत. फडावरच्या स्वैर वातावरणाचा त्यांच्यावर परिणाम होत असे. मुलींची अवस्था फारच वाईट असे. विठाबाईंनी याही परिस्थितीचा समर्थपणे सामना केला.

तमाशाचा फड विठाबाईनं पुरता काबीज केला. लोक निखळ विठाबाईंचा नाच पाहायला आणि त्यांचं गाणं ऐकायला येत असत. भाऊ-बापूंचा तमाशा आता नावापुरता त्यांचा उरला होता. गण, गवळण झाली की विठाबाई बोर्डावर यायच्या. त्यांनी बोर्डावर पाय ठेवला की, शिट्ट्या आणि टाळ्यांचा कल्लोळ व्हायचा. मग रसिकांकडून फर्माईशी सुरू व्हायच्या. विठाबाईंच्या पायातल्या घुंगरांनी, अंगातल्या चैतन्यानं, प्रत्येक अदेनं रसिकांना घायाळ केलं होतं. भाऊ-बापूच्या तमाशातली गवळण, बतावणी, वगाचं सादरीकरण सगळंच अफलातून असे. या वगांचे विषयही 'शिवप्रतापासारखे' ऐतिहासिक, 'सत्यवान सावित्री' सारखे धार्मिक तर कधी 'चंद्र-मोहन' किंवा 'मेवाडचा कोळी' सारखे सामाजिक असत. त्यामुळे तमाशाला येणारा प्रेक्षकवर्ग अगदी शहरातल्या बुद्धिजीवीपासून खेड्यातील अडाणी माणसापर्यंत सर्व थरातला असे. साहित्याची आणि लोककलेची आवड असणाऱ्या बहुतेकांनी भाऊ-बापूंचा तमाशा पाहिला होता. संगीत नाटक अकादमीच्या समितीवर असणाऱ्या काही ज्येष्ठ कलावंतांनीही हा तमाशा पाहिला होता. त्यांनी भाऊ-बापूंच्या तमाशाची समितीकडे शिफारस केली. हा तमाशा कलेच्या माध्यमातून लोकशिक्षणाचा कसा प्रचार करतो याची माहिती दिली. त्यांच्या या शिफारसीमुळेच भाऊ-बापूंच्या तमाशाला तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्यासमोर आपली कला सादर करण्याची संधी मिळाली. या वेळीही विठाबाई कार्यक्रमाच्या मुख्य आकर्षण ठरल्या. दिल्लीकरांकडून शाबसकी मिळवूनच त्या घरी परतल्या. लवकरच नाटक अकादमीच्या परीक्षक मंडळानं पुरस्कारासाठी भाऊ-बापूंच्या तमाशाची निवड केली आणि तमाशा क्षेत्रात राष्ट्रपती पुरस्कार मिळवणारा तो पहिला तमाशा ठरला.

सरकार दरबारी असं कौतुक झाल्यावर मग विठाबाईंनी मागं वळून पाहिलं नाही. तमाशातले त्यांचे स्पर्धक आता खूप मागं पडले होते. तमाशा म्हणजे विठाबाई असं समीकरण रूढ झालं होतं. आपला जन्म केवळ कलेसाठी झाला अशी त्यांची आपल्या कलेकडं बघण्याची दृष्टी आणि तिच्यासाठी काहीही करण्याची पराकोटीची भावना दिसून येई. विठाबाईंची आपल्या कलेवरची निष्ठा होती. त्यांच्या या स्वभावामुळेच त्यांनी अनेक माणसं जोडली. काही त्यांच्या वडिलांच्या काळापासून होती. त्यांच्या मदतीनं त्यांनी अनेक ठिकाणी आपली कला नेली. १९६२ मध्ये विठाबाईंच्या आयुष्यात आणखी एक महत्त्वपूर्ण घटना घडली. विठाबाई आणि त्यांच्या सहकाऱ्यांना लष्करातील जवानांची करमणूक करण्यासाठी नेफा सीमेवर जाण्याचं आमंत्रण मिळालं. विठाबाईंच्या कलेचा हा एक प्रकारे सन्मान होता. खरंतर त्यावेळी विठाबाईंची लेक मालती अवघी तीन महिन्यांची होती. पण आपलं कर्तव्य श्रेष्ठ मानून त्यांनी मुलांना घरच्यांच्या हवाली केलं आणि आपल्या फडाबरोबर नेफा सीमेवर गेल्या. सीमेवरच्या बर्फाळ आणि जंगलाच्या प्रदेशात त्या आनंदानं राहिल्या. रोज एका छावणीवरून दुसऱ्या छावणीवर जाणं, तिथे कला सादर करणं हे कष्टप्रद होतं. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या काळात त्यांना विश्रांतीची गरज होती, त्याच काळात ही दगदग त्या सोशीत होत्या. कालांतराने विठाबाईंच्या वडिलांचं-भाऊ खुडेंचं- आणि चुलत भाऊ बापू खुडेंचं निधन झाल्यावर तमाशाची सगळी सूत्रं त्यांचा दुसरा चुलत भाऊ सावळाराम यानं हाती घेतली. पण त्याच्या काळात फडात हेवेदावे सुरू झाले. आर्थिक स्थितीही ढासळली. विठाबाई आणि सावळाराम यांच्यात वितुष्ट आलं. याचा परिणाम एवढाच झाला की, विठाबाई आपल्या मुलींसोबत भाऊ-बापूंच्या तमाशातून बाहेर पडल्या आणि त्यांनी विठा-भाऊ (मांग) नारायणगावकर असा स्वतंत्र फड सुरू केला. त्यांच्या तमाशाचा लौकिकही आता दिवसेंदिवस वाढत होता. त्यांच्या संपर्कात राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि कला क्षेत्रातली मोठ-मोठी मंडळी येत होती. अशा रीतीने नारायणगावच्या गल्लीपासून ते दिल्लीपर्यंतच्या रसिकांच्या कानात विठाबाईंच्या पायातल्या चाळाचे बोल, गळ्यातले लावणीचे सूर निनादू लागले.

विठाबाईंची आर्थिक बाजूही भरभक्कम झाली होती. रसिकांनी त्यांच्यावर मुक्तहस्ते उधळलेल्या पैशामुळे नावलौकिकाबरोबरच चांगला पैसाही त्या गाठीला बांधत होत्या. पण जवळच्याच लोकांनी त्यांचा विश्वासघात केला.

पण विठाबाईंनी पुन्हा मुंबईचे जुने ठेकेदार प्रभाकर कामेरकर यांच्या मदतीनं नव्यानं फड सुरू केला. नव्यानं माणसं बांधली. या वेळी त्यांची मुलगी मालतीही त्यांच्या मदतीला होती. पण विठाबाई आयुष्यातल्या अनेक चढ-उतारांनी खचल्या होत्या. अधून-मधून त्यांना गोत्यात आणणाऱ्या नातेवाईकांच्या कारवाया, थोरली मुलगी मंगला बनसोडे हिचं विभक्त होणं, खुद्द विठाबाईंच्या तमाशाच्या बसला झालेला अपघात या सर्व घटनांनी त्यांचं मनोधैर्य खचत होतंच पण त्या कर्जातही आणखी रुतत होत्या.

तसं त्यांच्या कलेनंही त्यांना भरभरून दिलं. त्यांनी केलेली रसिकसेवा आणि कलेची सेवा सर्वपरिचित होती. त्यामुळे त्यांच्या पडत्या काळातही केवळ त्यांच नाव ऐकून त्यांना मदत करणारे अनेक जण होते. यात महत्त्वपूर्ण उल्लेख करावा लागेल तो लोकसत्ताचे तत्कालीन संपादक माधव गडकरी, वृत्तनिवेदक प्रदीप भिडे आणि तमाशाचे अभ्यासक प्रकाश खांडगे यांचा. या तिघांनी वृत्तपत्रातून, दूरदर्शनवरून विठाबाईंची परिस्थिती लोकांसमोर मांडली आणि त्यांच्यासाठी मदतीचा ओघ सुरू झाला. दुर्गाबाई भागवतांनी १०,००० रु. ची मदत केली. यातूनच या तमाशा सम्राज्ञीचा सत्कार करण्याची कल्पना पुढे आली. आणि मुंबईच्या एशियाटिक सोसायटीच्या सभागृहात विठाबाईंचा हा सत्कार सोहळा दुर्गाबाई भागवतांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमामुळे विठाबाईंचे कलेवरील प्रेम आणि निष्ठा पुन्हा एकदा रसिकांपुढे आली.विठाबाईंनी या पैशातून आपली जुनी देणी चुकती केली, गहाण पडलेल्या गाड्या सोडविल्या. इथून पुढे स्वत:च्या जिवावर फड चालवण्याची उमेद त्यांच्यात आता राहिली नव्हती. म्हणून आपला फड तिनं मुलीच्या फडात विलीन केला आणि स्वत: आपल्या वतनाच्या गावी म्हणजे नारायणगावला निघून गेल्या. पण माध्यमांच्या प्रसिद्धीमुळे त्यांचे नाव आता महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात आदराने घेतले जात होते. त्यामुळे तमाशातून पूर्ण अंग काढून घेऊनही त्यांचे सत्कार समारंभ चालूच होते. याच काळात संगीत नाटक अकादमीच्या पुरस्कारासाठी विठाबाईंच्या तमाशाची दुसऱ्यांदा निवड झाली. त्यांना आपल्या आयुष्याचे सार्थक झाल्याचे समाधान वाटले. विठाबाईंना त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यापर्यंत पुरस्कार मिळत होते.

विठाबाईंच्या आयुष्याचा लेखाजोखा मांडताना त्यांचं कलेवरचं प्रेम, निष्ठा, त्यासाठी केलेवरचं प्रेम, निष्ठा, त्यासाठी केलाला त्याग, निभावून नेलेले प्रसंग पाहिले की, आवाक व्हायला होतं. त्याच वेळी तमाशा फडांवरील काही अपरिहार्यतांमुळे झालेली आयुष्याची दैना हा सुद्धा त्यांच्या आयुष्याचा एक भाग होता. पण विठाबाईंची कहाणी अनुभवताना लक्षात राहतं ते त्यांचं तमाशाच्या क्षेत्रातलं अलौकिक कर्तृत्व! गावकुसाबाहेरच्या या कलेला त्यांनी लोककलेचा दर्जा दिला. विठाबाई हे एक अजब रसायन होतं. त्यांची कला, निष्ठा, त्यांचं आयुष्य, त्यांचं दु:ख, त्यांचा बहराचा काळ, या काळात भोगलेलं ऐश्वर्य, झालेली दुर्दैवी फसवणूक हे सगळंच विलक्षण होतं. समाजातील पुरुषप्रधान संस्कृतीनुसार तमाशाच्या फडावर, त्यातील कलावंतीणींवर पुरुषांचेच वर्चस्व असते. 'स्त्री' आपली कला सादर करते, पुरुषांकडून पैसा उधळला जातो, परत त्या पैशावर पुन्हा पुरुषच डल्ला मारतात. याही परिस्थितीत तमाशा फडाशी जोडलेल्या सर्व अपरिहार्यतांचा स्वीकार करून विठाबाईंनी कला जपली, लोकांना आनंद दिला. ही गोष्ट विठाबाईंची महानता अधोरेखित करते. विठाबाई भाऊ (मांग) नारायणगावकर यांचे निधन १५ जानेवारी २००२ रोजी झाले.

सावळ्या रंगाची देखना चेहरा असणारी ही नृत्यांगणा आपल्या अदाकारीने रसिंकांच्या मनावर हूकूमत गाजवायची.

# कॅलिफोर्नियात रंगणार मराठी चित्रपट महोत्सव

## मोठी मजल गाठली

'सितारे जमीन पर' पासून 'मां' आणि 'मेट्रो' पर्यंत जून आणि जुलै महिन्यात सलग चित्रपट प्रदर्शित झाले. जून महिन्याची सुरुवात 'हाऊसफुल ५' ने झाली आणि त्याने भारतीय तसेच जगभरातील बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. चित्रपटाने २० दिवसातच देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर करोडोंची कमाई केली.



सलग दोन चित्रपट प्रदर्शित झाल्यामुळे अक्षयची किलर कॉमेडी लवकरच संपेल, असे वाटले होते. तथापि, चित्रपट ३२ व्या दिवशीही बॉक्स ऑफिसवर मजबूत राहिला आणि चांगली कमाई केली. इतकेच नाही तर त्याने जगभरातील बॉक्स ऑफिसवर राज्य करुन एक मोठा विक्रमही रचला आहे.

'हाऊस फुल-५' ब्लॉकबस्टर ठरला नसला तरी बजेट वसूल करण्यात आणि जगभरातून नफा कमावण्यात यशस्वी झाला आहे. रिलीजच्या ३२ व्या दिवशी त्याने सुमारे पाच लाखांची कमाई करणे महत्त्वाचे म्हणावे लागेल. आतापर्यंत त्याने देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर १८३.२७ कोटींची कमाई केली आहे.

विकी कौशल आणि रश्मिका मंदाना यांचा 'छावा' ने जगभरात ७०० कोटींहून अधिक कमाई केली होती. 'हाऊसफुल ५' हा विक्रम मोडू शकला नाही, परंतु तो या वर्षीचा सर्वाधिक कमाई करणारा बॉलिवूड चित्रपट बनला आहे, यातही शंका नाही. त्याचे ३०० कोटींच्या क्लबमध्ये सामील होणे थोडे कठीण आहे, परंतु बॉक्स ऑफिसवर सुरू आहे तोपर्यंत कोणत्याही क्षणी स्थिती पलटू शकते.

## 'खतरों के खिलाडी' विषयी...

छोट्या पडद्यावरील लोकप्रिय रिॲलिटी शो बाबत बोलताना रोहित शेट्टीच्या 'खतरों के खिलाडी' चा उल्लेख केल्याखेरीज पुढे जाता येणार नाही. बऱ्याच काळापासून त्याने प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. अशातच गेल्या काही दिवसांपासून 'खतरों के खिलाडी सीझन १५' बद्दल चर्चा रंगत आहे. त्याच्या प्रीमियरबद्दल नवनवीन अपडेट येत असल्यामुळे लवकरच चाहत्यांना आनंदाची बातमी मिळू शकते. 'सीझन १४' संपल्यापासून प्रेक्षक त्याच्या पुढील सीझनची आतुरतेने वाट पाहत आहेत. तेव्हा आनंदाची बाब म्हणजे हा रिॲलिटी शो पुढील वर्षी जानेवारी २०२६ पासून सुरू होऊ शकतो, असे समजत आहे. अर्थात त्याची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही.

सलमान खानचा 'बिग बॉस' संपल्यानंतर तो कलर्स टीव्हीवर प्रसारित झाल्याचे अनेकदा दिसून आले आहे. पण दरम्यान अशा बातम्या देखील आल्या की आता



'बिग बॉस' कलर्स टीव्हीवर येणार नाही. अशा परिस्थितीत, 'खतरों के खिलाडी' कलर्ससोबत आपला प्रवास सुरू ठेवेल की नाही हे पाहणे रंजक असेल. तथापि, शो शी संबंधित या ताज्या अपडेटमुळे पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे. नेहमीप्रमाणे, यावेळीही 'खतरों के खिलाडी सीझन १५' मध्ये मनोरंजन विश्वातील अनेक सेलिब्रिटीज स्पर्धक म्हणून दिसू शकतात. नवीन सीझनच्या अप्रोच रेसमध्ये समाविष्ट असणाऱ्या सेलिब्रिटीजच्या नावांच्या यादीमध्ये कृषल आहुजा, दिग्विजय राठी, अविनाश मिश्रा, ईशा सिंग अशी काही नावे आहेत. त्याची अधिकृत घोषणा होणे बाकी आहे.

राम कोंडिलकर



मराठी चित्रपटांना हॉलिवूडच्या झगमगाटात सन्मानाने सादर करणाऱ्या 'नॉर्थ अमेरिकन फिल्म असोसिएशन' (नाफा) तर्फे आयोजित दुसऱ्या भव्य मराठी चित्रपट महोत्सवाला सॅनहोजे, कॅलिफोर्निया येथे २५ ते २७ जुलै २०२५ या कालावधीत रंगतदार सुरुवात होणार आहे. कॅलिफोर्निया थिएटर या प्रतिष्ठित स्थळी हा सोहळा आयोजित केला जाणार असून, यंदाचा महोत्सव अधिक भव्य आणि लक्षवेधी ठरणार आहे. 'देऊळ' आणि 'भारतीय' या चित्रपटांचे निमर्ति, सुवर्ण-कमळ राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित अभिजीत घोलप यांच्या संकल्पनेतून या महोत्सवाची सुरुवात गेल्यावर्षी करण्यात आली आहे. यावर्षी या महोत्सवासाठी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाचे मंत्री ॲड. आशिष शेलार यांना रीतसर निमंत्रण देण्यात आले आहे.. तसेच 'सॅनहोजे' कॅलिफोर्निया स्टेटचे महापौर यांनाही या महोत्सवाचे निमंत्रण देण्यात आले असून दोन्ही अतिथींनी संस्थेस त्यांचा तात्काळ होकार कळविला आहे. सॅनहोजेचे महापौर आणि महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक मंत्री यानिमित्ताने पहिल्यांदाच एका मंचावर एकत्र येत आल्याचे नाफा संस्थापक अभिजित घोलप यांनी जाहीर केले आहे.



नाफाचे संस्थापक अध्यक्ष अभिजित घोलप यांनी नुकतीच महाराष्ट्रात येऊन सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार यांची भेट घेऊन त्यांना या सोहळ्याचे रितसर निमंत्रण दिले आहे. शेलार यांनी त्यांना या सोहळ्यास उपस्थित राहण्याबाबत तात्कळ होकार दिला आहे. विशेष म्हणजे अमेरिकाच्या सॅनहोजे, कॅलिफोर्निया राज्याचे महापौर मा. मॅट महन यांनीही या महोत्सवास उपस्थित राहण्याचे मान्य केल्याने हा एक दुग्धशर्करा योग चालून आला असून यानिमित्ताने या दोन महनीय अतिथींच्या उपस्थितीने यंदाची अवार्ड नाईट आणि महोत्सव विशेष ठरणार असल्याची भावना अभिजित घोलप आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.'नाफा' हा उत्तर अमेरिकेतील रसिक प्रेक्षकांच्या सहकार्यातून सुरु करण्यात आलेला मराठी चित्रपटांसाठी स्थापन झालेला एकमेव मंच असून मराठी चित्रपटांच्या व्यावसायिक आणि कलात्मक उन्नतीसाठी सतत कार्यरत आहे. अमेरिकेत मराठी चित्रपटसृष्टीला हॉलिवूडसदृश दर्जा, ग्लॅमर आणि व्यावसायिक यश प्राप्त करून देण्यासाठी 'नाफा' कटिबद्ध आहे. ✻✻

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, **संपादकीय विभाग**-email : krushivalnews@gmail.com / **जाहिरात विभाग**- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)